# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | १९९६ |
| वर्ष | : | पहिलें |
| अंक | : | ३ |
| पृष्ठे | | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या**
**“ग्रंथालय” प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ३**

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा

वर्ष पहिले / अंक ३ / सप्टेंबर १९९६

## संपादकीय

### ख्रिस्ताब्द की युगाब्द

सत्ता, संस्कृती आणि प्रगती यांचे आजपासून पंचवीस वर्षांनी स्वरूप कसे असेल याचे भाकित करणारे एक पुस्तक इंग्लंडमध्ये नुकतेच प्रकाशित झाले आहे. लंडनच्या 'इंडिपेंडंट' या दैनिकाचे स्तंभलेखक हॅमिश मॅक्रे यांनी हे 'द वर्ल्ड इन 2020' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. रविवार २५ ऑगस्ट च्या 'लोकसत्ते'त 'तारतम्य' या सदरात श्री. अरुण टिकेकर यांनी या पुस्तकाची नोंद घेऊन काही मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. 'उद्याच्या जगात तांत्रिक प्रगतीपेक्षा सांस्कृतिक शक्ती महत्त्वाची ठरणार आहे, व राष्ट्राचे यश हे नागरिकांच्या चांगल्या वर्तनावर अवलंबून असणार आहे.' असा विचार त्यांनी मांडला आहे.

आजपासून सुमारे चार वर्षांनी हे जग एकविसाव्या शतकात पदार्पण करणार आहे. या संधिकालात साहजिकच गत शतकांचा आढावा व आगामी काळातील घटनांचा वेध घेण्याची स्पर्धाच आज जगात लागलेली दिसते. खरे पाहता मानवी प्रगतीचा कालपटल हा काही लक्ष वर्षांचा आहे. २०००वर्षे या आकड्याचे महत्त्व प्रामुख्याने पश्चिमकेंद्रित (Eurocentric) संशोधन-विश्लेषण करण्याच्या पगड्यामुळे आहे. ही कालगणना ख्रिस्ती धर्माचे प्रेषित येशू ख्रिस्त यांच्या जन्मापासून आहे. या गोष्टीला आक्षेप असण्याचे काहीच कारण नाही. परंतु या कालगणनेत एक धोका मात्र निश्चित आहे. ख्रिस्तपूर्व अस्तित्वात असलेल्या मानवी इतिहास व प्रगतीला यामुळे गौण व दुय्यम स्थान मिळते. पश्चिमकेंद्रित प्रगतीच्या विश्लेषणात 'प्रगती' ही श्रेणीयुक्त म्हणजे टप्प्या टप्प्याने, चढत्या क्रमाने वाटचाल करीत असल्याचे गृहीत धरले आहे (Linear, Sequential Progression) साहजिकच यामुळे प्राचीन, विशेषतः ख्रिस्तपूर्व संस्कृत्या या बाल्यावस्थेत, शैशवावस्थेत असल्याचे भ्रामक चित्र उभे राहते.

शब्द हे अर्थवाही असतात. अर्थामागे काही परंपरा, विचारप्रक्रिया, सांस्कृतिक छटा यांचे अस्तित्व असते. २१ व्या शतकाचे विवेचन करतांना शब्द अतिशय काटेकोरपणे वापरायला हवेत. नवे/जुने, आधुनिक/मागासलेले हे शब्द आपल्या नित्य वापराचे आहेत. यांचा अर्थ समजून घेण्याकरता कोणी शब्दकोष पाहत नाही. हे शब्द उच्चारताच काही ठराविक संकल्पना आणि अर्थ ध्वनित होतात. 'आधुनिक' किंवा 'नवीन 'हे शब्दच आपण घेऊ. हे शब्द उच्चारल्याबरोबर उपयुक्त, प्रगतिशील, आकर्षक, प्रभावी, भविष्यकाळाशी जुळणारी अशा गोष्टींचे रूप उभे राहते. 'जुने' किंवा 'मागासलेले' म्हटल्यावर जीर्ण, क्षीण होत चाललेले, क्षमता हरवलेले, अश्मीभूत, अडगळ, प्रगतिरोधक असे चित्र उभे राहते. कालक्रमानुसार नवे /जुने किंवा आधुनिक/जीर्ण ठरवणे यात काहीच गैर नाही. पण चेतन किंवा अचेतन, उपयुक्त किंवा निरुपयोगी, प्रगत किंवा मागासलेले या अर्थछटा ज्यावेळी त्यातून ध्वनित होतात त्यावेळी वस्तुस्थितीचा विपर्यास होण्याची शक्यता असते. हे कसे ते आपण पाहू.

वसाहतवादाचा पगडा, त्यातून निर्माण झालेली मानसिक व वैचारिक गुलामगिरी यामुळे दिवसेंदिवस आपण आपला व्यवहार इंग्रजी भाषेतून करू लागलो आहोत. निर्मिती ही नेहमीच कठिण असते, उसनवारी सोपी असते. साहजिकच परिभाषा निर्माण करणे, अडचण वाटली तरी अशा शब्दांचा सराव व उपयोग करणे, यापेक्षा तर्क आणि युक्तिवादाच्या साह्याने 'सर्वच विज्ञान इंग्रजीत आधीच उपलब्ध असताना मातृभाषेत ते आणण्याची गरजच काय ?' असा प्रश्न विचारणे सोपे जाते. परंपरेने बुद्धीची देण लाभलेल्यांना अडचण नसली तरी 'खालच्या पायरी' वरील समाजाच्या आकलन क्षमतेचा यात विचार केलेला नसतो. तेथे आपल्या आयुष्यापुरती तात्पुरती सोय बघितलेली असते. इंग्रजी भाषेचा विकास व तिची व्याकरणाची चौकट चांगली व उपयुक्त असली, तरी ती 'भाषा' म्हणून परिपूर्ण आहे असे भाषाशास्त्रज्ञांना वाटत नाही. इंग्रजी ही कालपटलावरील आधुनिक भाषा आहे. अधिक सरावाची व वापरली जाणारी भाषा आहे. साहजिकच या आधीच्या मानवी सभ्यता या इंग्रजी, जर्मन किंवा फ्रेंच यापेक्षा तंत्रदृष्ट्या अधिक विकसित, नियमबद्ध भाषा निर्माण करू शकतील, असे विसाव्या शतकातील अहंकारी माणसाला पटत नाही. संस्कृत ही कालगणनेत जुनी आणि आज व्यवहारात वापरात नसलेली, पण तंत्रगुणांमध्ये अधिक विकसित व आधुनिक भाषा आहे. निसर्गात आढळणारे धातू व खनिजे ही आज उपलब्ध झाली तरी ती नवीन नसतात, उलट त्यांची किंमत कालाच्या व्यस्त प्रमाणात ठरत असते. गणिती आकडे हे काही आधुनिक नाहीत. पण ते जुने असले तरी त्यांची उपयुक्तता कमी झालेली नाही, आणि म्हणूनच नवीन किंवा आधुनिकता हा शब्द मानवी विकासाचा विचार करताना मोजमापाच्या सोयीकरता, कालगणनेच्या निर्देशाकरता अर्थ सूचित होईल इतक्याच सीमित मात्रेत वापरणे आवश्यक आहे. उपयुक्तता, गुण, दर्जा, प्रत यांचा निर्देशांक असा त्याचा अर्थ वापरणे सोयीचे असते तरी वस्तुस्थितिदर्शक ठरणार नाही. या शतकापुरता विचार केला तरी विमान, दूरध्वनी, संगणक इ. अनेक गोष्टी या शतकाच्या सुरवातीला फारशा नव्हत्या. पण म्हणून मानवी शाश्वत मूल्ये ही त्यावेळी कमी होती व या उपकरणांच्या अस्तित्वामुळे आज त्या मूल्यांत वृद्धी झाली, मानवांच्या परस्परसंबंधात सुधारणा झाली, असा कुठलाही शास्त्रीय पुरावा उपलब्ध नाही.

याउलट अनिर्बंध उपयुक्तता व भोगवादाच्या आहारी जाऊन नैसर्गिक साधनसंपत्ती आपण वेगाने नष्ट करीत आहोत, हे आता सर्वमान्य झाले आहे. कुटुंबसंस्था, स्त्रियांचे कुटुंबातील स्थान, गुरुशिष्यनाते, कौटुंबिक व सामाजिक संबंध व या सर्वांतून निर्माण केलेल्या सामाजिक संस्था या हजारो वर्षे शाश्वत मानवी मूल्ये टिकवून आहेत. मानवाची सृजनशीलता आजची तांत्रिक उपकरणे नव्हती तेव्हा कमी होती, असे दिसत नाही. परंतु या उपकरणांशिवाय 'प्रगती' किंवा 'वैज्ञानिक' दृष्टी असणे शक्यच नाही, अशा अहंकारी पूर्वग्रहामुळे प्रगतीचे मूल्यमापन एकतर्फी आणि अन्यायकारक होते. आणि म्हणूनच साहित्य, कला, स्थापत्य, शास्त्रे, विज्ञान यांचे अस्तित्व प्राचीन मानवी सभ्यतांमध्ये असल्याचे नाकारण्यात येते. याच कलुषित आणि एकांगी दृष्टिकोनामुळे, अडीचतीन हजार वर्षांपूर्वी मांडले गेलेले ग्रहगणित, भूमिती, बीजगणित यांचा विकास हा एकतर मान्य केला जात नाही किंवा पश्चिमकेंद्री इतिहासात त्याला गौण स्थान मिळते. अनेक शास्त्रीय संकल्पना या तर चक्क 'अंधश्रद्धा' म्हणून दुर्लक्षिल्या जातात. याउलट तथाकथित प्रगतीमुळे झालेली 'हानी' व होणारा 'संहार' यांकडे डोळेझाक केली जाते. तंत्रज्ञान आणि विज्ञान यांना सोयीची भोगवादी जीवनपद्धती पश्चिमी संस्कृतीने स्वीकारली. यामुळे माणसाच्या आरोग्याची प्रचंड हानी झाली आहे. हृद्रोग, कर्करोग यांचे प्रमाण बेसुमार वाढले असून त्याचा संबंध थेट आधुनिक जीवनपद्धतीशी आहे, हे शास्त्रीय दृष्ट्या सिद्ध झाले आहे. तरीही चित्र मात्र असे उभे केले जाते, की माणसाचे आयुर्मान वाढत आहे, वैद्यकशास्त्रातील प्रगतीमुळे अनेक रोगांवर विजय मिळवण्यात आला आहे, इ. निरोगी आयुष्याची सुरुवात किंवा तसे आयुष्य जगण्याची तयारी जन्माआधीपासूनच सुरू करावी लागते. अतिधूम्रपान, मद्यपान, गर्भनिरोधक गोळ्या यांमुळे काही काळ स्वैर जीवन जगता येते, पण पुढील आयुष्यात अनेक भयानक रोगांना तोंड द्यावे लागते. अशा स्वैर भोगवादी जीवनपध्दतीमुळे २१ व्या शतकामध्ये लाखो अमेरिकन स्त्रिया गर्भाशय आणि स्तनाच्या कर्करोगाला

(पान क्र. ४ वर)

विद्या प्रसारक मंडळाचे
मासिक

# दिशा



वर्ष पहिले / अंक ३ / सप्टेंबर १९९६

संपादक
डॉ. विजय वा. बेडेकर

सहसंपादक
श्री. प्रकाश ल. वैद्य

कार्यकारी संपादक
डॉ. जी. व्ही. कुलकर्णी

कार्यालय
विद्या प्रसारक मंडळ,
डॉ. बेडेकर विद्यामंदिर,
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.

वार्षिक देणगी
रु. २०० /-

मुद्रक :
परफेक्ट प्रिण्ट्स,
२२, ज्योती इंडस्ट्रियल इस्टेट,
नूरीबाबा दर्गा रोड,
ठाणे - ४०० ६०१.

## अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १) संपादकीय | डॉ. विजय वा. बेडेकर | मुखपृष्ठ |
| २) सुभाषित | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | ३ |
| ३) Agriculture in Ancient India | डॉ. विजय वा. बेडेकर | ५ |
| ४) संहितारक्षण व मौखिक परंपरा | श्री. प्रकाश ल. वैद्य | १३ |
| ५) भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१) | डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी | २३ |
| ६) धर्म आणि शिक्षण | प्रा.(डॉ) मोरेश्वर दि. पराडकर | २७ |
| ७) ''अभिमन्यूचे व्रत'' | श्री. यशवंत साने | ३१ |
| ८) श्री. मधु नाशिककर -एक कृतिशील जीवन | माधवी कुलकर्णी | ३३ |
| ९) Xerox चे जनक व परामानसशास्त्र | प्रा. वसंत वि. अकोलकर | ३५ |
| १०) महाविद्यालय परिसरातील निसर्गरम्य वाटा | श्री. मोहन पाठक | ३७ |
| ११) संवाद स्वातंत्र्यदेवतेशी | डॉ. विजय वा. बेडेकर | ४० |

# लेखक - परिचय

१. *डॉ. विजय वा. बेडेकर*

वैद्यक व्यावसायिक, अनेक शैक्षणिक, सांस्कृतिक आणि सामाजिक संस्था आणि चळवळींशी निगडित, अध्यक्ष - प्राच्यविद्या अभ्यास संस्था, भारत सहकारी बँक, सत्य शोध संस्था; अनेक परिसंवादांचे संयोजन, संशोधनपर लिखाण, *शोध अंधश्रध्देचा* या पुस्तकाचे लेखक.

२. *प्रा. (डॉ) मोरेश्वर दि. पराडकर*

संस्कृत आणि हिंदी भाषेचे पंडित, अनेक वर्षे संस्कृतचे अध्यापन; आणि प्राचार्य म्हणून पेंढारकर कॉलेज, डोंबिवली मधून निवृत्त. बंबई हिंदी विद्यापीठाचे मानद कुलपती, संस्कृत,इंग्रजी, हिंदी आणि मराठी मधून विपुल संशोधनपर लिखाण. स्तबक या पुस्तकाचे लेखक.

३. *श्री. प्रकाश ल. वैद्य*

आय. आय. टी. पवई, मुंबई, येथून बी.टेक् (इलेक्ट्रिकल) ही पदवी संपादन, व्यवसाय -इलेक्ट्रॉनिक्स उद्योगात सल्लागार, विशेष आवड आणि संशोधन : भाषा आणि संगीत या विषयांत.

४. *श्री. रघुनाथ पु. कुलकर्णी*

अभियंता म्हणून शासकीय सेवेतून निवृत्त. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्राचा विशेष अभ्यास व संशोधन. अभियांत्रिकी संशोधन पत्रिकांतून अनेक संशोधनपर लेख प्रसिद्ध. *काश्यपसंहिता* या शिल्पशास्त्रावरील संस्कृत ग्रंथाचे मराठीत भाषांतर. प्राचीन वास्तुशास्त्रावर हिंदी, मराठी व इंग्रजीत ग्रंथरचना.

५. *श्री. यशवंत रा. साने*

सिव्हिल इंजिनियरिंग मधील पदवी. इस्टेट मॅनेजर ,म्हणून मुंबई पोर्टट्रस्टमधून निवृत्त. 'ग्रंथाली' या संस्थेचे विश्वस्त. एफ. आर. आय. सी. एस.(लंडन) इ. संस्थांचे सभासद, अनेक संशोधनपर निबंध प्रकाशित.

६. *श्री. वसंत वि. अकोलकर*

जन्म ६ जुले १९११. पुण्यातील वाडिया महाविद्यालयात आणि पुणे विद्यापीठ येथे मानसशास्त्राचे अध्यापन. इंडियन फिलॉसॉफिकल कॉंग्रेस (१९५९) आणि अखिल भारतीय दर्शन परिषद (१९६३) : मानसशास्त्रविभागाचे अध्यक्ष. अमेरिकेतील ड्यूक विद्यापीठात परामानसशास्त्रीय प्रयोगशाळेत काम (१९६३) मराठी विश्वकोश व मराठी तत्त्वज्ञान महाकोशाचे अभ्यागत संपादक. मानसशास्त्र, परामानसशास्त्र व तर्कशास्त्र या विषयांवर विपुल लेखन. १९९२ मध्ये *परामानसशास्त्र (अतींद्रिय मानस)* हा ग्रंथ प्रकाशित.

# सुभाषित

*सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम् ।*
*प्रदानं प्रच्छन्नं गृहमुपगते संभ्रमविधि :*
*प्रियं कृत्वा मौनं सदसि कथनं चाप्युपकृतेः ।*
*अनुत्सेको लक्ष्म्यां निरभिभव साराः परकथाः ।*

**श्री. मंगेश्वर दि. पराडकर**

संस्कृत कवींमध्ये सुभाषितांच्या बाबतीत कालिदासाच्या बरोबरीने ज्याचे नाव घ्यावे लागते असा कवी म्हणजे शतकत्रयाचा प्रणेता भर्तृहरी. हा इसवी सनाच्या सातव्या शतकाच्या पूर्वार्धातला राजपदावर आरूढ झालेला व साहजिकच अनुभवाने संपन्न असलेला कवी. भारतीय परंपरेनुसार याने शृंगारशतक, नीतिशतक आणि वैराग्यशतक अशी तीन सुभाषितांची शतके लिहून आपले नाव अजरामर करून टाकलेले आहे. रमणींच्या मादक सौन्दर्याने वेडावून जाणाऱ्या पुरुषांच्या विलासप्रियतेचे चित्रण करता करता जीवनातल्या उपभोगांच्या क्षणभंगुरतेकडे याने वाचकांचे लक्ष वेधले आणि परोपकार, वीरत्व, साहस, उद्योगप्रियता, औदार्य या गुणांची पूजा करून स्थायी मूल्यांची जाणीव करून दिली. या जगात सज्जन एक तऱ्हेचे कठिण, अगदी तलवारीच्या धारेवर चालण्यासारखे व्रत प्रत्यही चालवीत असतात हे सांगताना हा कवी मोठा मार्मिक प्रश्न विचारतो :-

*सतां केनोद्दिष्टं विषममसिधाराव्रतमिदम्।* सज्जनांना हे व्रत स्वीकारण्याचा कोणी उपदेश केला का ? नाही, तो त्यांचा स्वभावच असतो असे त्याला म्हणावयाचे आहे. मात्र अशा व्रताचे पालन करणे फार कठिण (विषम) असते हे सांगण्यास तो विसरत नाही. पण हे व्रत कोणते हे स्पष्ट करताना भर्तृहरी म्हणतो :-

*प्रदानं प्रच्छन्नं गृहमुपगते संभ्रमविधि :*
*प्रियं कृत्वा मौनं सदसि कथनं चाप्युपकृतेः ।*
*अनुत्सेको लक्ष्म्यां निरभिभव साराः परकथाः ।*

या तीन्ही ओळीत सज्जनांच्या दैनंदिन व्यवहारातल्या वागणुकीची वैशिष्ट्ये मोठ्या वेधकपणाने टिपलेली आहेत.

या असिधारा व्रताचे पहिले लक्षण 'प्रदानं प्रच्छन्नं' म्हणजे लोकांना धन किंवा आपल्या जवळच्या वस्तू द्यावयाच्या पण त्या गुप्तपणाने, गाजावाजा न करता अगदी उजव्या हाताने दिलेले डाव्या हाताला कळू नये अशा पद्धतीने ! आमच्या संस्कृतीत, 'दान मी केले' असे म्हटले की त्यातले मर्म नाहीसे, झाले असे मानण्याचा प्रघात होता. 'दानं संकीर्तनेन (सांगण्याने) विनश्यति'. म्हणूनच उपनिषदात 'ह्रिया देयम्' म्हणजे संकोचाने द्यावे असा सल्ला दिलेला आहे. वस्तुतः ही खऱ्या सज्जनाची प्रवृत्तीच असते असे कवीला सुचवावयाचे आहे.

सज्जनांच्या या दुर्धर व्रताचे दुसरे लक्षण 'गृहमुपगते संभ्रमविधी' म्हणजे घरी आलेल्या व्यक्तीचे स्वागत करण्याच्या बाबतीत गडबड उडून जाणे, मनाचा गोंधळ होणे. कसा सत्कार करू ? किती प्रमाणात करू ? असे अनेक विचार मनात येणे. यातूनच संभ्रम निर्माण होतो. एखाद्या वेळी असे होणे शक्य आहे , परंतु नेहमीच असा संभ्रम होणे हे अतिथीच्या आगमनामुळे मनात स्वाभाविकपणे सत्काराची आवड असण्याचा परिणाम आहे; 'अतिथिदेवो भव' ही प्रवृत्ती अंगी बाणल्याचे ते लक्षण आहे. म्हणूनच याला व्रताची थोरवी प्राप्त होते. घरी येणाऱ्या माणसाबद्दल अभिजात आस्था असल्याशिवाय हे होणार नाही. दूरदर्शनवर संध्याकाळी सिनेमा चालू असताना पाहुणा आला तर चेहऱ्यावर आठ्या पडलेल्या ज्या जमान्यात दिसतात, त्या जमान्यात तर हे दुष्कर असे असिधाराव्रतच आहे हे मान्य होण्यास हरकत नाही.

तिसरे लक्षण आहे 'प्रियं कृत्वा मौनम्'. एखाद्याचे थोडे जरी चांगले केले तरी ते जाणवून देण्याची सध्याची प्रवृत्ती लक्षात घेतली तर चांगले करूनही मौन पाळणे, सतत तसे करीत राहणे हे फारच कठिण आहे; भल्याभल्यांना हे जमणार नाही , हे पटल्या वाचून राहत नाही. मुळात दुसऱ्याचे चांगले करणारे लोक अल्पसंख्यच असतात मग चांगले करून त्याचा उल्लेख टाळणे, तशी प्रवृत्ती जोपासणे अत्यंत बिकट.

'सदसि कथनं चाप्युपकृतेः' ही या नाण्याची दुसरी पण तितकीच महत्त्वाची बाजू. स्वतः केलेल्या चांगल्या गोष्टीची जाणीव ठेवावयाची नाही. परंतु दुसऱ्याने केलेल्या उपकाराचा उल्लेख जाणूनबुजून करण्याचे व्रत स्वीकारावयाचे हे सज्जनांचे काम. 'सदसि कथनं' म्हणून जाहीर वाच्यतेवर जोर दिलेला आहे. हे कृतज्ञतेच्या पोटीच होऊ शकते आणि कृतज्ञता हा गुण दुर्मिळ होत चाललेला आहे, हे मान्य केले पाहिजे.

'अनुत्सेको लक्ष्म्याम्' म्हणजे वैभव असताना, लक्ष्मीचा वरदहस्त असताना गर्व नसणे, हा तर सज्जनाच्या या व्रताचा अगदी विलोभनीय असा पैलू. थोडेसे मिळाले, सुखाची काही साधने जमवता आली तरी अभिमान निर्माण होतो. अहंकार वाढतो. ज्यांच्या जवळ ही साधने नसतात त्यांच्याबद्दल तुच्छता वाटू लागते. एके काळी आपल्याजवळही संपत्ती नव्हती याचा विसर पडतो. 'कालक्रमेण हि धनानि भवन्ति यान्ति' हे लक्षात राहत नाही आणि कर्तृत्वाचा कैफ चढतो. ही कथा दुर्जनांची, अर्ध्या हळकुंडाने पिवळे होणाऱ्यांची. सज्जन लोक मात्र संपत्ती मिळाल्यामुळे अधिक नम्र होतात, पाण्याने भरलेल्या ढगांप्रमाणे वाकतात. हे 'येरागबाळ्याचे काम नव्हे' हेच खरे.

सज्जनांच्या या व्रताचा शेवटचा पैलू दुसऱ्यांबद्दल बोलताना (परकथाः) दोष देण्याची दूषण लावण्याची, निंदा करण्याची प्रवृत्ती नसणे; किंबहुना त्यांच्याबद्दल सतत चांगले बोलण्याची प्रवृत्ती जोपासणे. महाभारतातला राजा युधिष्ठिर हे या व्रताचे उत्तम उदाहरण. तो दुर्योधनाला सुद्धा सुयोधन म्हणून त्यातला 'दुर्' चा भाग काढून टाकीत असे.या उलट परनिंदा ही काही जणांच्या पाचवीला पुजलेली असते. हा मोह टाळणे सोपे नाही. अफवा पसरविणे ही माणसाची प्रवृत्ती असते म्हणूनच दुसऱ्याबद्दल सतत चांगले बोलण्याचा स्वभाव असणे हेही सज्जनांचे काम. बरे, या सर्व गोष्टी करा, असा सज्जनांना कोणी उपदेश केलेला नसतो; किंवा तो त्यांनी धारण केलेला मुखवटाही नसतो. तात्पर्य, वागण्यातला चांगलेपणा आणि गोडवा हा सज्जनांचा स्वभाव; ते त्यांचे असिधाराव्रतच असते असे म्हणून भर्तृहरीने सज्जनांना मानाचा मुजरा केलेला आहे.

●●●

(मुखपृष्ठ क्र. २ वरून)

**संपादकीय**

बळी पडणार असल्याची भीती, अमेरिकेतील वैद्यकीय संशोधकांनी वर्तविली आहे. अशा जीवनपध्दतीचाच परिणाम म्हणून युरोपमधील, अतिप्रगत देशांमधील पुरुषांच्या वीर्याची जननक्षमता कमी होत असल्याची दखल शास्त्रज्ञांनी घेतली आहे. स्वैर लैंगिक जीवनपद्धतीमुळे 'एड्स्' सारखा रोग मानवजातीला आह्वाने उभा करत आहे. या जीवनपद्धतीमुळे द्यावी लागणारी 'आर्थिक' आणि 'सामाजिक' किंमत अभ्यासकांच्या डोळ्यासमोर काजवे चमकावू लागली आहे. दुर्दैवाने या पाश्चिमात्य सांस्कृतिक अतिक्रमणाला 'प्रगती' किंवा 'मुक्त' असे गोंडस नाव देऊन, आमच्यातले अनेक विद्वान आणि शास्त्रज्ञ, पाईंपाईने ही जीवनपध्दती, वैज्ञानिक दृष्टिकोनाचा एक भाग म्हणून, आमच्या विशेषतः स्त्रियांच्या बोकांडी उतरवीत आहेत.

जर गांभीर्याने भविष्याकडे पाहायचे असेल तर प्रगतीच्या विश्लेषणातील हे 'पूर्वग्रह' व 'अहंकार', आणि विज्ञान व तंत्रज्ञानाची 'वकिली' सोडून द्यायला हवी. भारतीयांपुरता विचार केला तर उसनवारी व पाश्चिमात्यांचे अंधानुकरण आपल्याला अधिक परावलंबी, लाचार, आळशी आणि आत्मघातकी बनवेल. पाश्चिमात्य शास्त्रज्ञ, विद्वान, आणि चिंतनशील नागरिक हे यासंदर्भात अधिक तटस्थतेने विचार करताना दिसतात, याउलट पाश्चिमात्यांच्या खांद्यावर उभे राहिलेले भारतीय वैज्ञानिक आपण अधिक प्रगतिशील, पुरोगामी आणि आधुनिक आहोत हे दाखविण्याकरता विज्ञानाच्या उसन्या कुबड्या घेऊन आपली 'जीवनपद्धती' व 'परंपरा' यांवर चिखलफेक करताना दिसतात. सर्व 'जुने' ते 'सोने' हे जेवढे खरे नाही, तेवढेच सर्व 'नवे' ते चांगले, प्रगतिशीलआणि वैज्ञानिक, हे सुद्धा खरे नाही. भारतीयांनी तरी मानवाच्या प्रगतीचा कालपटल दोन हजार वर्षांपुरता मर्यादित न ठेवता कमीतकमी पाच हजार वर्षे तरी (युगाब्दाप्रमाणे) धरायला हवा, नाही तर आपण मात्र २१व्या शतकात, आणि पाश्चिमात्यांनी वस्तुस्थितीचा स्वीकार करून त्यांनी लिहिलेल्या 'मानवाचे ५२ व्या शतकात पदार्पण व त्याचे विश्लेषण' असा ग्रंथ आपल्याला वाचावा लागेल.

●●●

# AGRICULTURE IN ANCIENT INDIA

*Dr. Vijay V. Bedekar*

[Introductory Speech delivered by Dr. V. V. Bedekar in the seminar **Agriculture in Ancient India** held on 25th April, 1992 at Thane under the auspices of Institute for Oriental Study, Thane]

I heartily welcome you all to this one-day Seminar on Agriculture in Ancient India, arranged under the auspices of the Institute for Oriental Study, Thane.

When this topic was announced a year back, many eyebrows were raised and doubts expressed - Did anything worth that could stand in comparison with to-day's agricultural advances in all its technology and methodology, exist in the past? Or is it an empty boast? You are the best judges today as more than 20 papers - ranging from Vedic times to medieval times, exposing the extensive hidden or concealed expertise in ancient Indian agriculture, will be presented to you. By the end of the day, you will realize that it is not the ignorance about ancient Indian agricultural system prevalent in India, but a kind of resistance due to heavy bias towards modernity, that prevents us to imagine, understand or even appreciate that any achievement of merit by earlier generations of civilization was possible. We take our period of past as a period of infancy, and progress as linear growth.

Alas ! We are not totally aware of the cost we are paying for our agricultural achievements of today. Our ignorance of modern agricultural system is a matter of greater concern today, than how much more or little we know about our ancient agricultural system. We talk about the world having come nearer today due to newer systems of communication. All success-stories of green and white revolutions are not a global phenomenon in the true sense, but a success story of a few advanced countries or of a few states in a country or a few districts in a state. Some portion of the civilization is suffering from the hazards of over-eating, while a much larger section of the civilization has hardly anything to eat. It is those who have produced more to consume more, that are responsible for the present global ecological problems. We have more than 20 million hungry people in Africa, not due to any natural disaster, but due to man-made destruction of natural resources. Everyday there is some news of shrinking of tropical rain forest. Now Australia, and California in the U.S.A.,etc., are on the verge of facing a drought. What about our own country and for that matter, our own State of Maharashtra, which is supposed to be one of the most progressive and prosperous States in India? We are reading in the newspapers that Maharashtra is facing drought and there is going to be an acute shortage of water. Are all these things suggestive of any sound progress or achievements over our past agricultural system? The crux of the problem lies in the lifestyle, which we have adopted to suit to scientific achievements, so-called progess and modernity. Against

this background, we have to compare the modern and ancient systems of agriculture, not in terms of per acre output or per capita consumption of wheat or rice or any other such indices, which have no relevance or accountability to our environment and natural resource tapping. Sheer greed to produce more has damaged our environment beyond our imagination, and I am afraid that , if we do not realise this in time, we will be facing a situation of irreversible damage to natural resources. Our indiscriminate use of inorganic fertilizers and pesticides today, will make my point clear. The World Health Organisation (WHO) has shown with adequate supportive data, that many of the pesticides used today are known to accumulate in plant, water and living organisms; they are potentially cancer-inducing. They have also been shown inducing genetic changes. Most of these chemicals are non-bio-degradable or have a very delayed bio-degradability, which has proved to have adverse impact on our nervous system.

In today's seminar, we have two very interesting papers on the types, nature and system of the use of fertilizers in ancient India. A more detailed study of ancient Indian literature will open the floodgates of information and knowledge on this vital subject, and may give us some clues for safer practices of those agents. The highest scientific body in USA and various other researchers in other parts of the world have proved that organic farming is more productive than the use of inorganic fertilizers and pesticides. But Indians in their haste and trying to become more 'modern', are imitating the West blindly. Today, in India there are more than 132 pesticides which have been granted provisional registration under the Act.

Out of these, only 13 have been fully cleared, and scientific data on the effect of pesticides when ingested by living organisms, are available only in respect of 5 out of 132.

We are entering into the Eighth Five Year Plan, while crores of rupees have already been spent in earlier plans on irrigation and for provision of clean drinking water. On this front also, the picture is not only grim, but frightening. Every passing day brings before us a State or a region entering newly on the map of the country, with either water-table going down or salinity increasing due to indiscriminate, excessive and uncontrolled attempts to tap water from natural resources.

I will be failing in my duty, if I do not mention here the name of Shri Sunderlal Bahuguna, who is fighting a highly dignified and restrained battle against our deaf and mute planners. His fight to save Himalayan ecology is going to protect future generations from the impending disaster.

We have four papers in today's seminar from water-divining to irrigation sytem in ancient India. The information presented is just the tip of the iceberg, and the subject deserves another fuller seminar exclusively.

The material available on agriculture in ancient Sanskrit and Prakrit literature is vast. Apart form specific texts on the science of agriculture, which are

numerous, one also gets ample information about agricultural systems, in the works of grammarians like Panini and Patanjali, from texts of Shilpashatra, other works like Kautilya's Arthashastra, Varahamihira's writings and even in drama and poetry works of writers like Kalidasa. We have more than six papers related to this topic, in this seminar. For a fuller justice, one has to sift all ancient Indian literature irrespective of the subject proper it deals with.

For a correct understanding of any Indian system - be it spiritual or material science - a complete knowledge of both the systems is essential. Indian way of looking at human life, human relations, its relations with Nature etc., have a common thread of thought process which binds them all, and its appreciation is essential for an independent study of any of them. Agriculture is no exception to this.

Agriculture was a part of the whole system. A non-agricultural section of the society was equally responsible for agriculture and those who were involved in agricultural operations were equally accountable to the non-agricultural happenings in the society. Every trade or vocation was important and complementary to others. **The concept of India as a purely agricultural country is also far from the truth, and is just a product of modern ideological theory and jargon of economics. All ancient Indian literature and historical evidence go contrary to this belief and suggest India as a very powerful agricultural as well as commercial and industrial power on the earth, prior to the advent of the British.** There are innumerable references to Indian products of all kinds exported to various parts of the world. I quote below a few glaring examples which speak for themselves.

In the early days of the Christian era (1st century A.D. - about 2000 years ago) Roman women's passion for Indian cloth was so intense that they decorated themselves in seven folds of Indian muslin (called 'Nubula' by the Romans) and paraded in the streets, which brought an embarrassing situation to the city fathers, and the Roman Senate had to intervene and put an embargo on the import of that fine stuff from India. Pliny, a Roman writer, complained in the early 2nd century A.D. that "... in no year does India drain our empire of less than 550 millions of sesterces", which was approximately equivalent to stirling pounds 1,400,000 in the 19th century. Another author has noted that in the year of Aurelian, i.e., around the latter half of the third century A.D., this cloth was worth its weight in gold. The Indian exports to Europe of all commercial and agricultural products were much higher at the time of the arrival of the British than in the post-British period. Peter the Great of Russia (1682-1725 A.D.) considered the commerce of India "as the commerce of the world, and ... he who can exclusively control this is the dictator of Europe".

While Indian exports were so high, Europe had almost nothing to sell to India except bullion. The East India Co., which was chartered in 1600 A.D. used to send to India £ 400,000 to £ 500,000 a year to buy Indian goods for exports before 1757 A.D.

It was in 1757 A.D. that the Battle of Plassey was fought, and the victorious British started extending their tentacles in India. I quote Sir George Bidwood, who observes -

*"... the whole world has been ceaselessly pouring its bullion for 3000 years into India to buy products of her industries".*

It is said, history repeats itself. The drain of British bullion was so painful and again the Indian textiles, which had become very popular in England, became the victims of enactments for their prevention from entry into England. William III of England in 1700 A.D. prohibited the entry of Indian textiles by imposing a fine of £ 200 to the wearer or the seller of Indian silk and calico.

As in textile and in many other basic industrial products, India supplied the best quality of steel then known to Europe. In 1794 A.D. Dr. Scott, M.D., sent to the President of the Royal Society a specimen of wootz steel from India. The sample was put to thorough examination and was analysed by several experts. One such was Mr. Stodart, who qualified the variety of steel from India for fine cutlery and particularly for all edged instruments used for surgical purposes. After this, that variety of steel was much in demand in Europe and even 18 years later, Stodart was of the opinion that "... if a better steel is offered to me, I will gladly, attend to it; but the steel of India is decidedly the best I have yet met with". These achievements are possible only when there is optimum soci-economic stablility in the society. Is this not adequate testimony to suggest that, by and large the common people in India were living in greater co-operation and harmony, in better and prosperous conditions and had better skills and better earnings as against the perpetrated stories of "thousands of years of atrocities" so dear to the ideologically committed sociologists, historians, economists and politicians of today ? **My point here was just to bring to your notice that in India agriculture was not the sole vocation or industry which people depended upon, but agriculture, trade and commerce prospered simultaneously and not at the cost of each other.**

Now we will come to the position of agriculture and irrigation prior to the advent of the British. The position was far more superior and almost all travellers' accounts speak highly of Indian agriculture and crops. I quote a few :

A Report from British Commission of the North-West Provinces (present Uttar Pradesh) in 1808 says -

*"In passing through the Rampore territory, we could not fail to notice the high state of cultivation which it had attained ... If the comparison for the same territory be made between the management of the Rohillas and that of our own Government, it is painful to think that the balance of advantage is clearly in favour of the former".*

Luke Scrafton, a member of Clive's Council, in his book 'Reflections of the Government of Hindustan' (printed in 1770) writes :

*.... The manufactures, commerce and agriculture flourished exceedingly and none felt the hand of oppression...nor is there a part of the world where arts and agriculture have been more cultivated of which the vast, plenty and variety of manufactures and the merchants were proofs sufficient".*

A traveller in Berar says :

*"We experienced very civil and hospitable treatment and found plenty of every kind of grain which this highly cultivated country produced at a very cheap rate".*

The picture got radically changed after the Britishers started ruling the country, through their imported system of ownership of land, land tenure, land revenue, laws, education etc.

**In the 18th and 19th centuries , in the free countries of the world the number of people engaged in agriculture was becoming less, while that of those in industry and service sectors of the economy was increasing. In India, exactly the reverse was happening. There was 'agriculturalisation' of the people with increasing 'deindustrialisation' of the society. The bond of coordination between industry and agriculture in India was destroyed, and a new bond of India's agriculture and Britain's industry was established.** Destruction of rural and cottage industries, allied trades and commerce ruined all supportive vocations of bulk of the population and the people thus thrown out from their vocations crowded in the agriculture sector. Coupled with new land ownership policy of the British, even the peasants started getting uprooted from land ownership. **Land was never a mortgageable commodity in India earlier to British. It was rarely transferrable as a matter of right. The laws enacted around 1835 A.D. and in the following years by the British, conferred unrestricted rights of transfer of land on occupants of all classes. It could be mortgaged now ,and could be recovered through the British Court of Law. The chief architect of 'Survey Settlement' George Wingate saw this facility as a means of getting rid of uneconomic cultivators and substituting them by pensioners, traders and other parties having capital. This was a turning point in the history of Indian agriculture.** In the pre-British India, land had no exchange value and labour was costly. During British rule, all those who were deprived of their vocations and trade, flocked to agricultural land, and labour became cheap. These things are evident from the repeated famines during the early British rule in India. This has been endorsed by the Famine Commission appointed in 1878, which says:

*"At the root of much of the povery of the people, of India, and the risks to which they are exposed in seasons of scarcity, lies the unfortunate circumstance that agriculture forms almost the sole occuption of the mass of the population, and that no remedy for present evils can be complete which does not include the diversity of occupations through which the surplus population may be drawn from agriculutral pursuits and let to find the means of subsis-*

*tence in manufactures or some such employment....."*

These were crocodile tears, as the British themselves were responsible for destroying diversity of occupation which was available to society before their rule.

Another blow to the whole system of agriculture was given by introducing zamindari in India, in the British style. In pre-British India the State or the Crown was not the sole owner of the soil, unlike in Britain. Even if the king wanted land for his personal use, he had to buy it from the person under whose cultivation it was. Peasants had to pay a fixed share of their produce which was minimal, and which was paid normally in kind and occasionally in cash. No agency - zamindar or State could ever deprive the peasants of their holdings, while in Britain the actual cultivators were mere labourers.

These changes in land policy and revenue system literally shattered the whole system of agriculture and trade in the country. In every territory the British conquered, they tried to raise their revenue through land, irrespective of its potentialities. Poona went in the hands of the British in 1818. In 1817, the revenue was £ 800,000. In 1818, it was raised to £ 1,150,000, and after a few more years it rose to £ 1,500,000. The people were getting poorer and poorer and the rulers were getting richer and richer. But there is not dearth of people in India who see divinity in the British rulers, and condemn the Peshwas for petty political gains. Similar is the case with Punjab, which was annexed in 1849. In 1847-48 the land revenue in Punjab was £ 820,000. Within three years it escalated to £ 1,060,000.

The case of the Peshwa is very interesting. The year 1800 is considered as the beginning of the downfall of the Peshwa rule. Whatever may be the political situation or circumstance, at least till the advent of the British, the common man in Peshwa raj had a superior lifestyle and enjoyed prosperity. The social history of people needs a total re-writing with newer available sources. Sir John Malcolm visited the Maratha country around 1803 and his findings are -

*"It has not happened to me ever to see countries better cultivated, and more abounding in all produce of the soil, as well as in commercial wealth, than the Southern Maharashtra districts... Poona, the capital of the Peshwah, was very wealthy and a thriving commercial town, and there was as much cultivation in the Deccan as it was possible an arid and unfruitful country would admit".*

This statement of Sir Malcolm is not the only proof of well-being of the Poona country agriculturally, but we also have a supportive evidence of prosperity of people, through other sources. Nagpur, in the year 1800, had a very flourishing textile trade. Before the downfall of Peshwa in 1818, the export of cloth woven in Nagpur city and around, to Pune was of the value between Rs.1,200,000 to Rs.1,400,000. Within eight years of British raj i.e., in 1826, it was hardly Rs.300,000. The agricultural prosperity of Pune people in turn helped the craftsmen and tradesmen in Nagpur area to prosper. Peter Harhnetty in his paper

"De-industrialisation Re-visited: The Handloom Weaver of the Central Province of India c. 1800-1947", published in 'Modern Asian Studies' (1991, Great Britain) writes-

*"They (Kosthis) employed Brahmins for their weddings and were not stigmatised as impure, as were most weaving castes. They enjoyed high standard of living and spent lavishly on wedding and other ceremonies..."*

He further writes-

*"The general population wore coarser cloth woven by Mahars (Dhers) though the best such cloth sold for Rs. 20 a piece. In Nagpur, Dhers spun an extremely fine thread which was then woven by Kosthis into dhotis and saris which were the common dress of all classes in Maharashtra".*

This evidence again strengthens the fact that in the pre-British India when vocations were coordinating with each other, people lived in perfect harmony without any caste taboos, while after the advent of the British, due to the British policies, their vocations were destroyed. They became landless, occupationless and poorer.

As we study and peep in other subjects and literature for ancient Indian agricultural system, the study of agricultural system in ancient India also gives us in turn newer visions and broader horizons for a better understanding of other branches of science, life and culture in ancient India. What we need is an unbiased, non-modern, truly neutral approach to the study of ancient Indian systems. I quote two examples before I conclude. One again is of British times and the other of recent times.

Dr.Hove travelled through Konkan, Gujrat and Kathiawar during 1787-88. While passing through Thane, this very town, he has written a very interesting experience as to how the local indigenous experience and knowledge were more useful regarding construction of a sluice. He writes -

*"...In consequence, a sluice was proposed, which cost the Company several lacks of rupees. However, as it was begun too late in the season, and finished in the beginning of the rains, so that the combination of the bricks was but slight, and soon demolished by the first freshes, and at last found useless. The engineer who built it, gave it as his opinion, that no sluice could be made sufficiently resistible, or else they would have allowed him double the sum of the former. The expense incident on the former occasion being already too great, and without the least advantage, the Governer in Council thought it fit to declining, and left it to decay, till a Bania addressed himself to the Governor, with the following proposal. That he would build it up again, and keep it in repair, if they would grant him the plantations for fifteen years free from every tax. The Governor, having given up every thought of receiving any benefit from it, granted him the demand. The Bania, having obtained the permission set on to work in the proper season, and finished it a considerable time before the rains. I had the satisfaction of congratulating him today on his good success, which to my idea he will enjoy, to the infinite censure of the engineer. The rainy*

*season this year was rather severe; however, I could not observe the least damage the sluices have received. I have not seen the Engineer, but must give as my candid opinion that he little understood his profession....The Bania, having obtained permission, made the secret known, by opening four sluices more, which he accomplished with a trivial expense and has every prospect of enjoying it..."*

This simple example speaks of the people who had adequate knowledge to support their own agricultural system and irrigation, where theoretical knowledge without experience of the local conditions hardly helps or sometimes leads to disasters.

I quote a very interesting modern example from an authoritative scientific journal 'Nature'(Vol.353, October 24, 1991):

*"US studies on the amount of methane - a potent contributor to the greenhouse effect - produced by Indian cows, overstated their threat by a third because they assumed the Indian animals were as large as their US counterparts, a new Indian study finds. Researchers at the Council of Scientific and Industrial Research (CSIR), as part of an exercise to collect data for the 1992 world climate conference in Brazil, say that US researchers simply extrapolated US bovine measurements made "under very different conditions" from those in India. Indian cows eat and weigh less than US cows. Similarly, methane emissions from Indian rice paddies are less than from US paddies of the same size because of smaller biomass of Indian rice plants. Based on world measurements, CSIR estimates that total Indian methane output is just over 10 million tonnes a year - less than a quarter of the 48 million tonnes a year that the US Environmental Protection Agency and Oak Ridge National Laboratory have calculated".*

I am sure, Indian systems will have to be studied by avoiding such mathematical and statistical superimpositions of western culture, mind and data, and they should also not fall a victim to ideological and political zealots.

I hope today's Seminar will be a step in this direction.

I thank you all for honouring the invitation of the Institute to participate in the Seminar.

The Proceedings and Papers presented at the seminar on 'Agriculture in Ancient India' held at Thane on 25th April 1992 under the auspices of Institute for Oriental Study, Thane, have been published and are available with 'Itihas Patrika Prakashan, Dr. Bedekar Hospital, Shiv-shakti, Naupada, Thane - 400 602.

Cost Rs. 250/-

●●●

# संहितारक्षण व मौखिक परंपरा

श्री. प्रकाश ल. वैद्य

प्रास्ताविक

भाषा म्हणजे संकेतप्रणाली. रुपयाला वस्तू म्हणून मूल्य नाही, संकेत म्हणून आहे. शब्दाला अर्थ तसा रुपयाला 'अर्थ' असतो. जननभाषेत रासायनिक परमाणूंना अर्थ असतात व ते संदर्भावर अवलंबून असतात. यातील दोष हा पुढे अनर्थ घडवतो. कुठल्याही गुंतागुंतीच्या प्रणालीत छोटी चूकही घातक ठरू शकते.

'छिद्रेषु अनर्थाः बहुली भवन्ति ।'

जननभाषेतील दोषांचे अवस्थेनुरूप प्रकार व तत्सदृश भाषिक/साहित्यिक रूपे जनन भाषिक दोष तीन अवस्थात येऊ शकतात.

१) जनन दोष

२) जन्म

३) आयुष्य

जननदोष : मातापित्यांकडून मिळणाऱ्या जनुकातच, हे वंशपरंपरेने येतात. बरेचसे इतके घातक असतात की मूल जन्माआधीच मरते. दोष गंभीर असतात त्या व्यक्ती प्रजनन करीत नाहीत. त्यामुळे असे दोष आपोआप निवृत्त होतात. पण जे जीवघातक नाहीत ते जिवंत व्यक्तीत उतरतात व त्यांच्या प्रजननातून पुढे जात राहतात. लेखांक 2 मध्ये अशा दोषांची चर्चा केली. एकंदर जन्मदोष (जिवंत बालकांत) 1% असतात. हे प्रमाण साधारण कायम राहते. अशा दोषांचा भार 1% आहे. (जसे 1% AQL = Acceptable Quality Level) अंतर्विवाहामुळे सुप्त असलेले अप्रभावी दोष प्रकट होऊ लागतात. त्यामुळे अगदी छोटा समुदाय लोप पावू शकतो.

या दोषांमुळे प्रजननात चिंता राहते (आपले मूल मतिमंद असेल तर ?) त्या 1% व्यक्तींना सामान्य आयुष्य जगता येत नाही. मतिमंदांना त्याची जाणीवही नसेल पण त्यांच्या कुटुंबियांना पुष्कळ दुःख भोगावे लागते. शेवटी समाजाला कुठल्या ना कुठल्या स्वरूपात याची किंमत मोजावीच लागते.

जननदोषांवर नियंत्रण ठेवून जनुकसंहिता टिकवणे याचे साहित्यातील संहितारक्षणाशी साम्य आहे.

आनुवंशिकतेने आलेली जनुके व त्यातील जननदोष हे मूळ संहितेतील दोषांप्रमाणे असतात. संहितेवर मूळ लेखकाचा (निसर्गाचा) अधिकार असतो. संहितेचा अर्थ समजून अमुक ठिकाणी दोष आहे असे सांगता येत नाही. शंका आली तरी संहिता टाळणेही सोपे नाही. ते दुरुस्त करावे म्हटले, तर आधी दोष कोणते व कोठे आहेत हे समजले तरच पुढे काही करता येईल.

आधी एक मूळ संहितेची प्रत तरी हवी. म्हणजे तिच्यातील पाठभेदांच्या तुलनात्मक अभ्यासावरून दोष हुडकता येतील. यासाठी पूर्ण मानवी जनुकांची (Human Genome) सूची बनविण्याचे काम प्रगत राष्ट्रांत चालू आहे.

अनेक कारणांनी दोष येत राहतात ते मुख्यतः गर्भपात, गर्भमृत्यू इ. मुळे टळतात व पुढील पिढ्यांना त्यांचा त्रास होत नाही.

संयोगात्मक प्रजनना (sexual reproduction) मध्ये जनुक जोडी पैकी मातापित्यांकडून प्रत्येकी एक एक येते. याचे अनेक लाभ आहेत. जननदोषांच्या दृष्टीने फायदा असा की अप्रभावी दोषी जनुक असेल तर जोडीच्या दोषहीन जनुकामुळे व्यक्तीत दोष निर्माण होत नाही. प्रभावी जनुकामुळे व्यक्तीत दोष निर्माण झाला तरी पुढल्या पिढीतील ½ जणांनाच दोषी जीन मिळते त्यामुळे दोषाचा प्रभार कमी होतो. एकंदरीत डुप्लिकेटमुळे एक किल्ली हरवली तरी दुसरी चालू शकते. ही एका तऱ्हेची अतिरिक्तता (redundancy) आहे ज्यामुळे दोषांचा परिणाम कमी होतो.

एक संहिता एकालाच पाठ असली व तो चुकला तर चूक समजण्यास वा सुधारण्यास काहीच मार्ग नाही व अशा चुका पिढ्यानपिढ्या वाढतच जातील. कानगोष्टींच्या खेळात पहिल्याने जे दुसऱ्याच्या कानात सांगितलेले असते त्याचा विपर्यास होत होत शेवटी भलतेच काहीतरी पोहोचते. अफवा पसरण्यातही अशीच प्रक्रिया घडते. कानोकानी जाणाऱ्या गोष्टींमध्ये मूळ गोष्टीचा विपर्यास होतो.

याउलट एकच संहिता दोघांना पाठ करावयास सांगितली तर त्यातील एक कोणी चुकला तर दोघांच्या पठणात फरक पडेल, व पाठभेदाचे संशोधन करून अर्थावरून किंवा संदर्भावरून मूळ पाठ शोधता येईल. दोघांऐवजी तीन पाठक असतील तर भेदस्थानी जो पाठ दोघांचा जुळेल तो ग्राह्य धरता येईल, कारण दोघे एकदम एकाच रीतीने चुकण्यापेक्षा तिसरा एकटा चुकला असण्याची शक्यता जास्त आहे.

एखादी संहिता वंशपरंपरा न फरक पडता टिकावी असे जर वाटत असेल तर अशा काटेकोर उपाययोजना कराव्या लागतात. नपेक्षा संहितेत दोष निर्माण होत होत तिचे मूळ स्वरूप पालटून जाईल. याचे उत्तम उदाहरण म्हणजे ऋग्वेदसंहिता. हे बहुधा जगातले सर्वात प्राचीन वाङ्मय (वाक् + मय = बोललेले) असावे असे संशोधकांना वाटते. ती मूळ स्वरूपात आजही टिकून आहे असे समजले जाते. हस्तलिखित न करता केवळ मौखिक परंपरेने पाठ करून पिढ्यान्‌पिढ्या ती मूळ अवस्थेत टिकवली गेली आहे. हे कसे घडले ? जगातील बाकी कुठल्याच वाङ्मयाबद्दल - लिखित वाङ्मयाबद्दल सुद्धा - असे छातीठोकपणे सांगता येत नाही मग मौखिक परंपरांची तर गोष्टच सोडा. ऋग्वेदसंहिता टिकवली गेली यामागे काहीतरी योजना असली पाहिजे. वेदांचा अभ्यास करण्यासाठी सहा वेदांगे रचली गेली, त्यांचा वेद टिकविण्यातही सहभाग आहे.

पहिले म्हणजे शुद्ध उच्चारण. भाषेतील प्रत्येक वर्णाचे विशिष्ट शारीरिक क्रियेने शुद्ध उच्चारण कसे करावे हे 'शिक्षा' या पहिल्या वेदांगामुळे समजते (शिक्षा म्हणजे शिक्षक किंवा न्यायाधीश करतात ती नव्हे !) यामुळे अशुद्ध उच्चारणामुळे होणारे अपभ्रंश टळतात. शुद्ध उच्चारांवर कटाक्ष ठेवला तर सर्वजण शुद्ध बोलतात व भाषेत दोष निर्माण होत नाहीत , त्यामुळे भाषा एकमेकांना निर्दोष समजते, एवढेच नव्हे तर ती पिढ्यानपिढ्या टिकून राहते. हे वेदांच्या बाबतीत व संस्कृत भाषेच्या बाबतीत घडलेले आहे. ऋग्वेद किमान 3500 वर्षे व आद्य संस्कृत, (ही वैदिक भाषेपेक्षा थोडी निराळी आहे.) किमान 2000 वर्षे, टिकून आहेत. बाकी साहित्य वा बाकी भाषांचे काहीही होवो, वेद व संस्कृत भाषा यापुढेही टिकण्यास काही प्रत्यवाय नाही.

भारतवर्षभर सहस्रावधी वेदपाठक सतत कुठल्याही क्षणी अस्तित्वात होते. ते सर्व एकाच तऱ्हेने पठण करू शकत होते. समजा कोणी चुकलाच तर त्याची चूक इतर अनेकांशी ताडून बघता आली असती व काढून टाकता आली असती. अर्थात असे करण्याची वेळच येत नसे, कारण मूळ पठणच निर्दोष असे! परंतु केवळ अनेक पाठक असण्यावर हा निर्दोषपणा अवलंबून नव्हता. वर्णाची चूक तर 'शिक्षे' मुळे शक्यच नव्हती. या शिवाय ही रचना तालबद्ध किंवा लयबद्ध होती, त्यामुळे चूक झाली तर लय बिघडलेली लगेच समजते यासाठी 'छंद' हे दुसरे वेदांग उपयुक्त होते. शिवाय छंदोबद्ध रचना उदा. कविता लक्षात ठेवण्यास सोप्या असतात व त्या बिनचूक लक्षात राहू शकतात.

हे पठण निरनिराळ्या स्वरूपात केले जाई. आपल्या सर्वांना परिचित दोन प्रकार म्हणजे संहिता व पदपाठ. संहिता म्हणजे संधी, म्हणजे वर्ण जोडून घेणे जसे श्लोक वगैरे म्हणताना आपण करतो. उदा. गणपत्यथर्वशीर्षातील दुसरी ओळ : (संहिता) त्वमेव प्रत्यक्षं तत्त्वमसि = (पदे) त्वम् + एव प्रति +अक्षम् तत् +त्वम्+असि. संहितेत समजा काही चूक झाली तर पदे (साध्या भाषेत शब्द) पाडल्यानंतर चुकीचे पद झालेले दिसेल. पद हे व्याकरणनियमांनी बनत असल्यामुळे त्यातील प्रकृती (मूळ शब्द) किंवा प्रत्यय (लागणारा विकार) यातील काय चुकले आहे ते लक्षात येईल. यासाठी अर्थातच 'व्याकरणा' ची आवश्यकता होती, हे झाले तिसरे वेदांग. अशा रीतीने शिक्षा, छंद, व्याकरण या तीनही वेदांगांचा प्राथमिक उपयोग शुद्धपठण करण्यासाठी होत होता.

संहितापाठ (जोडून) व पदपाठ (तोडून) याशिवाय जटा, घन, क्रम असे इतर अनेक प्रकारचे पाठ होते. यात मूळ रचना उलटसुलट करून वाढवलेली असे व तशी पाठ केलेली असे.

या वाढवलेल्या रचनेत चूक झाली तरी ती इतर संदर्भांवरून शोधून दुरुस्त करता येते व मूळ रचना अबाधित राहते. एकापेक्षा अधिक पाठ एका व्यक्तीला अवगत असत उदा. त्रिपाठी म्हणजे तीन तऱ्हेचे पाठ अवगत असलेली व्यक्ती व पर्यायाने अशा व्यक्तीचे कुल.

वर्ण, मात्रा, शब्द यांच्या अपभ्रंशांना अनुक्रमे शिक्षा, छंद, व्याकरण यांमुळे पायबंद बसतो पण यापेक्षा मोठे अपभ्रंश असतील तर ? उदा. एखादी ऋचाच गाळली वा मध्ये कोणी घुसडली तर ? यासाठी ऋचांची क्रमवार रचना करून त्यांना क्रमांक दिलेले होते. त्यामुळे अधेमधे गळती किंवा घुसवणूक झाली तरी ती क्रमांकावरून निश्चित लक्षात येईल. एवढेच नव्हे तर एकूण ऋग्वेद संहितेत 4,32,000 अक्षरे आहेत असेही मोजून ठेवलेलेच होते. काय बिशाद कोणी एका अक्षराचाही फरक करेल !

एकूण वेद जरी तीन : ऋवेद, यजुर्वेद, अथर्ववेद; किंवा सामवेद धरून चार, असले तरी ऋग्वेदालाच अनन्यसाधारण महत्त्व आहे. सामवेद हे ऋग्वेदाचेच रूपांतर म्हणता येते, त्यामुळे राहिले इतर दोन वेद. यजुर्वेद = यजुस् + वेद हा नावाप्रमाणे यजन म्हणजे यज्ञकर्म यासाठी रचलेला आहे. हे त्याचे कार्य झाले, पण त्याची रचना छंदोबद्ध नाही. तीच गोष्ट अथर्ववेदाची. इथे आपण अर्थ किंवा प्रतिपाद्य विषय यांचा विचार करीत नसून केवळ रचनेवर लक्ष केंद्रित करीत आहोत. ऋग्वेदाची रचना प्रमाणबद्ध आहे व तो मूळ रूपात टिकवण्यासाठी योजना आखलेली आहे त्यामुळे तो जसाचा तसा 3500 वर्षे पार करून आपल्यापर्यंत पोचला आहे.

आजकाल आपण कुठलीही गोष्ट नीट लक्षात ठेवायची तर ती लिहून ठेवतो (व विसरून जातो !) पण लेखनाचा आधार न घेता ऋग्वेद टिकवला गेला आहे हे आश्चर्यच नव्हे काय ? लेखन महत्वाचे, लिहितावाचता आले तर साक्षरता येते, व साक्षरतेशिवाय शिक्षण अशक्य आहे असे मानण्याचा आजचा जमाना आहे, पण आजही असे कुठलेही वाङ्मय टिकवण्याची हातोटी आपल्याजवळ नाही. याउलट आपण ज्याला अनिवार्य मानतो त्या लेखनाचा अवलंब न करता, किंबहुना लेखन टाळून (अधम पाठकांच्या यादीत लिखितपाठक: म्हणजे लिहिलेले वाचून पाठ करणारा असा एक प्रकार वर्णिला आहे !) हे वाङ्मय टिकवले ही निश्चितच विचार करायला लावणारी गोष्ट आहे.

अशी योजनाबद्धता नसते तेव्हा काय घडते ? ज्ञानेश्वरीचे उदाहरण घेऊ. ज्ञानेश्वरांनी 13 व्या शतकात हा ग्रंथ रचला. त्यावेळच्या प्रचलित भाषेप्रमाणे तो बिनचूक होता असे धरून चालू. त्याचा पुष्कळ प्रसार झाला. त्याचे वाचन करीत असत, पण केवळ स्मरणाने पठण करण्याची परंपरा नव्हती. लेखनाची सोय होती व अनेक हस्तलिखित पोथ्या निर्माण झाल्या. 3 शे वर्षांनी 16 व्या शतकात एकनाथांच्या लक्षात आले की प्रचलित संहितेत पाठभेद शिरले आहेत, व मूळ काय होते हे शोधून काढणे इष्ट आहे. ज्ञानेश्वर एकनाथांच्या स्वप्नात आले व 'अजानवृक्षाची मुळे मला बोचत आहेत ती दूर कर' असे त्यांनी सांगितले, अशी कथा सांगितली जाते. हे रूपक असावे. प्रत्यक्षात एकनाथांनी अभ्यास करून ज्ञानेश्वरीची शुद्धप्रत पुन्हा तयार केली. असे करण्याची वेळ का आली ? ज्ञानेश्वरांनी सर्वसामान्यांसाठी म्हणून त्यावेळच्या प्रचलित (मराठी) भाषेत ग्रंथ रचला खरा, पण ही भाषाच स्थिर नव्हती. त्यामुळे कुणी बदल केले तरी समजणे कठिण होते. शिवाय ज्ञानेश्वरी ही काव्यरूप असली, तरी छंददृष्ट्या फारशी नियमबद्ध नाही. म्हणजे व्याकरण व छंद दोन्ही बाबतीत प्राकृत रचना कच्ची पडू शकते. एकनाथांनंतर आजवर 400 वर्षे लोटली. या काळात छपाईचा शोध लागला, साक्षरता वाढली. पण आज उपलब्ध असलेली संहिता शुद्ध आहे असे छातीठोकपणे म्हणता येईल काय ? विद्वानांचे सुद्धा यावर एकमत दिसत नाही. लेखन, छपाई सारखी बाह्य साधने असली तरी आपल्या भाषेच्या आद्य व महत्वाच्या ग्रंथाच्या संहितेबद्दल सुद्धा आपल्याला ग्वाही देता येत नाही. 300 वर्षे लेखनाची सोय व प्रघात असून ही संहिता दोषपूर्ण झाली तर ऋग्वेदसंहिता ह्याच्या दसपट 3,100 वर्षे दोषरहित राहिली, तीसुद्धा लेखन न करता ! यातून बरेच काही शिकण्यासारखे आहे.

ही मौखिक परंपरा दैवी मानल्या गेलेल्या वेदांपुरतीच होती असे समजावे, तर तसेही नाही. सर्व धार्मिक, लौकिक व शास्त्रीय वाङ्मयाला इतकेच काय कलांनाही ती उपयोजलेली आहे. संपूर्ण वेदसंहिता पाठ असणारे थोडेच असतील, पण सर्व धार्मिक संस्कारांचे मंत्र वेदाधारित व लौकिक संस्कृतात आहेत. धर्मविधींसाठी येणारे गुरुजी ते नेहमी पाठच म्हणतात. पूजेसारख्या विधीत कुणी काय करावे याबद्दलच्या आज्ञाही त्या पाठातच गोवलेल्या असतात. मंत्र उच्चारतांनाच हाताने विविध गोष्टी करण्याचीही हातोटी गुरुजींना असते, या पूजापाठांच्या पोथ्या असतात, पण त्या संदर्भापुरत्या व गंधफुले वाहण्यासाठी. पठण करणाऱ्याला अडले म्हणून पोथी उघडून बघावी लागली असे कधी घडत नाही.

हे पाठ ऐकताना तरी बिनचूक वाटतात, म्हणजे गुरुजी कधी अडखळले असे वाटत नाही. पण हा आभास कशावरून नसेल ? ते कधीतरी बेमालूमपणे चुकीचे कशावरून म्हणून टाकत नसतील ? याला प्रमाण तुलनेचे. जसे जनुकद्वयामुळे चूक समजून येते त्याचप्रमाणे अनेक, म्हणजे दोन किंवा अधिक पाठक असतील तर तुलनेने चूक लगेच लक्षात येईल. काही वेळा अनेक मंत्रपाठक एकाच वेळी मोठ्याने मंत्र म्हणत असतात जसे समूहगीत म्हटले जाते. उदा. रुद्र, अथर्वशीर्ष, मंत्रजागर इ. यावेळी सुरांची वा तालाची, साथ वा आधार नसतो. स्वर व लय बोटाच्या हालचालींनी व्यक्त केली जाते. अशा वेळी सर्व पाठक एकाच वेळी एकाच सुरात व लयीत बिनचूक पठण करीत असतात. यातील सर्वजण एकसारखे चुकीचे पठण्याची शक्यता नाही, त्याअर्थी सर्वजण निर्दोष पठणच करीत असले पाहिजेत. हा पठणाच्या निर्दोषपणाचा ताळा कुणालाही बघता येतो.

हे पाठ पद्य असतातच असे नाही. तरीही ते सुरावर व विशिष्ट लयीत संगीतरूपात म्हटले जातात- गणपतिअथर्वशीर्षाचेच पठण आठवून बघा. यामुळे ते कर्णमधुर लागतात व वातावरणनिर्मिती होऊन ऐकणाऱ्याच्या चित्तवृत्ती शांत होतात. शिवाय संगीतमय असल्यामुळे ते पाठ करण्यास सोपे जातात व बिनचूक लक्षात राहतात. कितीही महत्त्वाचा क्रियेचे आधुनिक गद्य वर्णन अशा कसोटीला उतरेल काय ? मूळ संस्कृत पाठ टिकले आहेत ते या सर्व गुणांमुळे. त्यांचे प्राकृतीकरण करण्याचे प्रयत्न झाले तरी ते संस्कृतला वाट पुसतच.

केवळ धार्मिक विधींपुरता याचा उपयोग होता असे नव्हे. कीर्तनकारांना सर्व आख्यान पाठच असे. गद्य, पद्य, गायन व कधी नृत्य यांनी युक्त तो एकपात्री प्रयोगच असे. तसेच सामूहिक भजने व स्तोत्रे, आरत्या इ. जनसामान्यांना तोंडपाठ असत. यापैकी प्राकृत रचनांत कालमानाने अपभ्रंश येत असत , पण संस्कृत रचनांचे शुद्धत्व ताडून बघता येत असल्यामुळे त्या पिढ्यान् पिढ्या बिनचूक राहत. याचप्रमाणे लहानपणी गणित शिकण्याआधीच पाढे पाठ केले जात. यात 2 ते 29 पर्यंतचे पाढे व पावकी, निमकी इ. अपूर्णांकांचे पाढेही असत. हे गणिताने ताडून बघता येत असल्यामुळे शब्दरूप भाषेबरोबर बदलले तरी पाढे बिनचूकच राहत असत.

याचप्रमाणे काव्यरचना, शास्त्रविषयक श्लोक इ. तोंडपाठ असत. ते संस्कृतमध्ये असल्यामुळे बिनचूकच राहत. वेदपठणाच्या परंपरेने आदर्श घालून दिल्यामुळे इतर सर्व शास्त्र व कलांना अशीच परंपरा निर्मिण्याची व टिकवण्याची स्फूर्ती मिळाली. संस्कृतमध्ये व्याकरण हा सर्व शास्त्रांचा पाया मानला जातो व त्याला परंपरेत अनन्यसाधारण महत्त्व दिलेले आहे. व्याकरण नीट शिकल्यानंतरच कुठल्याही विशेष विषयाचा अभ्यास गुरू शिकवत असत. व्याकरणात गेली 2000 हून अधिक वर्षे पाणिनीने रचलेले सूत्रबद्ध व्याकरण हे सर्वात महत्वाचे मानले गेले आहे. किंबहुना हे व्याकरण पक्के असल्यामुळे संस्कृत भाषा होती तशी इतकी वर्षे टिकली असे म्हणता येईल. हे व्याकरण अनेक बाबतीत जगात अद्वितीय समजले गेले आहे, व आजही जगभरचे अभ्यासक त्यातून नवीन अर्थ व प्रेरणा शोधू पाहत आहेत.

या व्याकरणाचे पहिले वैशिष्ट्य म्हणजे ते सूत्रबद्ध आहे. म्हणजे संक्षिप्त वाक्यांच्या क्रमाच्या रूपात ते रचले आहे. सूत्रांना क्रमांक दिलेले असल्याने ती मागेपुढे करता येत नाहीत. संपूर्ण व्याकरण पाठ केले जात असे. हा वेदपठणासारखाच प्रकार झाला. इतकेच नव्हे तर ते

वेदांप्रमाणे स्वरयुक्त म्हटले जाई. हे स्वर केवळ गोडव्यासाठी नसून त्या स्वरांत अर्थही दडलेला असे. यात वर्णिलेली संपूर्ण संस्कृत भाषाच स्वरयुक्त असावी असे दिसते. पण आपण या स्वरयुक्त भाषेला व तज्जन्य अर्थाला सध्या मुकलो आहोत. या व्याकरणात लौकिक भाषेबरोबरच वैदिक (आर्ष) संस्कृतमधील भिन्न रूपे व स्वरविचार ही केलेला आहे. वेदांप्रमाणेच हे केवळ मौखिक परंपरेने शिकवले जात असे, त्यामुळे वेदांप्रमाणेच त्याच्या लिखित पोथ्या नव्हत्या. असे असूनही तेही वेदांप्रमाणेच रचल्यापासून निर्दोष राहिले आहे असा निर्वाळा आजही देता येतो. व्याकरणाचे केवळ नियमच तोंडपाठ होते असे नव्हे, तर विविध नियम ज्या शब्दांना लागू पडतात त्या शब्दांचे गट (यांना गण म्हणतात) तोंडपाठ असत. संस्कृत भाषा धातू - म्हणजे क्रियापदांची मूळ रूपे - यांवर रचलेली आहे. या सर्व धातूंची यादीही पाठ असे. या याद्यांना अनुक्रमे गणपाठ व धातुपाठ म्हणत. शब्दांचे 200 हून अधिक गण आहेत व धातुपाठात जवळजवळ 2000 धातू आहेत. हे धातू 10 गणांत विभागलेले आहेत हे आजही आपण शिकतो. प्रत्येक गणाचा स्वतंत्र पाठ असल्यामुळे धातू कुठल्या गणात आहे हे आपोआपच लक्षात राहत असे. प्रत्येक धातूला गणाबरोबरच परस्मैपद, आत्मनेपद वा दोन्ही यांचे प्रत्यय लागतात. आज आपण 'चुर् 10 उभयपद' असे पाठ करतो पण मुळात धातुपाठात धातू उच्चारतानाच विशिष्ट स्वरात उच्चारला जात असे व त्यावरून परस्मैपद आत्मनेपद वा उभयपद सूचित होत असे. सध्याचे शालेय शिक्षण त्या परंपरेने होत नसल्यामुळे आपल्याला प्रत्येक धातूचा गण व पद लक्षात ठेवावे लागते. भाषा स्वरयुक्त होती व स्वरांनी अर्थ व्यक्त होऊ शके असे पूर्वी म्हटले त्याचे एक उदाहरण धातुपाठाच्या पदसंकेतात आताच पाहिले. असे कितीतरी आश्चर्यजनक बारकावे आहेत. संस्कृत भाषा व तिचे व्याकरण हेवा वाटण्यासारखे का आहे हे यावरून काही प्रमाणात लक्षात येईल.

याप्रमाणे सर्व तत्त्वज्ञानाचे मूळ वेद व सर्व शास्त्रांचे मूळ व्याकरण यांनी अशी निर्दोष मौखिक पठणाची परंपरा घालून दिल्यावर इतर सर्व कला व शास्त्रे यांनी तीच अंगीकारली. विद्या गुरुमुखी असे त्याचे कारण ही परंपरा. शास्त्रेच नव्हे तरा कलांनीही ही परंपरा पाळली. संगीताचेच उदाहरण पाहू. संगीत ही भारतीय परंपरेत सर्वश्रेष्ठ कला समजली गेली आहे. तिचा उपयोग केवळ मनोरंजनासाठी नसून तिच्यामुळे आध्यात्मिक उन्नती होते असेही मानले जाते. संगीताचे मूळही वेदांच्या सामगायनात असल्याचे समजतात. वेदांप्रमाणेच संगीतही मौखिक परंपरेने चालत आले आहे. संगीतशास्त्र लिखित व पोथीबद्ध असे. परंतु संगीतकला मात्र मौखिकच होती. संगीतरचनेचा प्रत्येक भाग गुरूकडून ऐकून शिष्याला स्मरणात ठेवावा लागे. प्रत्येक रचना तासभराची असेल तर तासभराची ध्वनिफीत जणू काही डोक्यात जमवावी लागे. व अशा शेकडो रचना गुरूकडून शिकता येत.

भारतीय व इतर परंपरा : भारतीय परंपरेचे मूळ वेदात आहे व वेद हे मौखिक परंपरेने टिकवले गेले, तसेच पाणिनीय व्याकरण व भारतीय संगीतही अशाच परंपरेत राहिले. इतर शास्त्रे व एकूण शिक्षणातच मौखिक परंपरा राखण्यात आली ती जवळ जवळ या शतकापर्यंत. वेद याचा अर्थ ज्ञान असा होतो. ते ज्ञान पुस्तकरूपात असल्याचा उल्लेख नाही पण ते सुसंबद्ध असल्याचे (संहिता) जाणवते.

याउलट ख्रिस्त्यांचा प्रमुख ग्रंथ The Bible याचा अर्थच 'पुस्तक' असा होतो. हे मूळ हिब्रू भाषेत असावे. मृत समुद्राजवळ सापडलेल्या चर्मलेखांवरून (Dead Sea Scrolls) याचा पुरावा मिळाला. त्याअर्थी ते लेखी स्वरूपात पूर्वीपासून आहे. नंतर त्याची ग्रीक, लॅटिन व आधुनिक युरोपीय भाषा यात एकामागून एक भाषांतरे झाली. रोमन कॅथॉलिक चर्च लॅटिन भाषिक बायबल मूलभूत भासवीत असली तरी ते केवळ भाषांतरच आहे. मूळ काय होते हे लेखी पुराव्यांवरूनच ठरवावे लागते. थोडक्यात ख्रिस्ती परंपरा लेखनाधिष्ठित दिसते. ही व इतर परंपरा शब्दशः 'पोथीनिष्ठ' आहेत. काही 'ग्रंथनिष्ठ' आहेत.

भारतीय परंपरा निराळी असल्याचे जाणवते. या वैशिष्ट्यांचा तुलनात्मक विचार करणे इष्ट आहे. प्रथम मौखिक परंपरेबद्दलचा आधुनिक विचार पाहू. सर्व मानवसमूहांत निरनिराळ्या भाषांचा उदय झाला. 'भाषा' हा शब्दच अन्वर्थक असून त्याचा अर्थ बोलणे असा आहे. इंग्रजी Language हा शब्द Lingua म्हणजे जीभ यावरून आला आहे. भाषांना इंग्रजीत Tongue (जीभ) म्हणतात.

उदा. Mother-tongue = मातृभाषा. भाषा ही बोली म्हणूनच उगम पावली. चिनी इ. भाषा चित्रलिपीत लिहिल्या जातात, पण ही काही मुक्याबहिऱ्यांची खुणांची किंवा चित्रांची भाषा नव्हे, कारण चिनी भाषा सुद्धा बोललीच जाते. म्हणजे बोलणे हे भाषेचे आद्य रूप आहे. आद्य (Primary ) असण्याबरोबरच ते प्राथमिक (Primitive) रूप आहे असे हल्ली समजले जाते, पण असे समजणे विवाद्य आहे.

बोली भाषा : काही भाषा या बोली स्वरूपातच राहिल्या. उदा. अनेक आफ्रिकी भाषांत लेखन नव्हतेच. धर्मप्रसारासाठी गेलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी त्यांचा अभ्यास करून त्या रोमन लिपीत (A,B,C etc.) लिहिण्यास सुरुवात केली. आपल्याकडील कोकणी ही बोली आहे पण तिच्यात लेखन हल्लीच सुरू झाले. ती महाराष्ट्रात देवनागरी, गोव्यात रोमन, तर कर्नाटकात कन्नड लिपीत लिहिली जाऊ शकते. इतकेच काय दाक्षिणात्य राज्यांत बोलली जाणारी तुळू ही भाषा अजूनही लिपिबद्ध नाही. याउलट सर्व प्रगत व साहित्यप्रचुर भाषा लिपिबद्ध आहेत. यावरून असे वाटणे शक्य आहे की ज्याअर्थी लेखन ही भाषणानंतरची प्रगती आहे त्याअर्थी लेखन हे भाषणापेक्षा नेहमीच श्रेष्ठ असते. परंतु लेखनाने दिपून जाऊन भाषणाला गौण ठरवणे म्हणजे कळस बांधल्यावर पायाची जरूरच काय असे म्हणण्यासारखे आहे.

भाषा = मानवलक्षण : बोली भाषा सर्व माणसांना अवगत असते (मुके सोडून) , किंबहुना भाषा हे मानवप्राण्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे. मानवाची व्याख्या, 'बोलणारा प्राणी ' अशी करता येईल. कुठल्याही मानवसमूहात बोली भाषा ही असतेच. ती आपोआप शिकली जाते, त्यासाठी कुठलीही साधने, शिक्षक व शाळा यांची आवश्यकता नसते. जन्मतः बालकाला आवाज काढता येतो पण बोलता येत नाही. असे बालक हे पाळीव प्राण्यासारखे असते. (ज्यांना मूल नसते ते ती उणीव पाळीव प्राण्यांच्या साह्याने भरून काढण्याचा प्रयत्न करतात.) सुमारे एक वर्षाचे झाल्यावर बालक बोलू लागते, याच वेळी ते चालू लागते. हा काही योगायोग नव्हे. दोन्ही क्रियांसाठी मेंदूकडून स्नायूंचे नियंत्रण व सुसंबद्ध हालचाल होण्याची आवश्यकता असते. प्राणी चालू शकतात पण कधीच बोलू शकत नाहीत. एक वर्षाचे बालक बोलू लागले की ते इतर सर्व प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरते, व हे श्रेष्ठत्व पुढे वाढतच जाते.

लेखन : लेखनाचे मात्र तसे नाही. मानव कसा उत्क्रांत झाला हे केवळ तर्कानेच जाणून घ्यावे लागते. परंतु जगभरचा मानव आधी बोलू लागला असला पाहिजे. कदाचित सहस्रावधी वर्षे तो केवळ बोलतच असेल. आजही केवळ बोलणारे समाज अस्तित्वात आहेत. यावरूनही असे वाटते. आजही अनेक देशांत - यात भारतही आला - केवळ बोलता येणाऱ्यांची पण लिहिता न येणाऱ्यांची म्हणजे निरक्षरांची संख्या मोठी आहे. औद्योगिक समाजासाठी साक्षरता ही मूलभूत आवश्यकता आहे. अशा समाजात साक्षरांमध्ये, किती वर्षे शिकली यावरून व्यक्तीची पायरी ठरते. किमान एक तप म्हणजे 12 वर्षे तरी शिकले पाहिजे, म्हणजे 12वी उत्तीर्ण झाले पाहिजे अशी अपेक्षा केली जाते. शिक्षणाचे मोजमाप लेखनसंभारावर केले जाते. पण हे सर्वस्वी योग्य असेलच असे नाही.

भाषाशास्त्राच्या दृष्टीने वाणी हे भाषेचे मूळ माध्यम आहे. ते मानवाच्या शरीररचनेशी निगडित आहे. आपल्या मुखावयवांच्या रचनेमुळे व मुख्यत: जिभेवरील नियंत्रणामुळे आपल्याला बोलता येते. आपण कुठले वर्ण उच्चारू शकतो हे या वस्तुस्थितीनेच ठरलेले आहे त्यामुळे जगभरच्या भाषात तेच तेच वर्ण आढळतात. सर्व भाषांतले वर्ण एकत्र केले तरी त्यांची एकूण संख्या मर्यादित दिसते. यामुळेच जगातील कुठलीही भाषा आंतरराष्ट्रीय उच्चार वर्णमाला (IPA = International Phonetic Alphabet) वापरून लिहिता येते. याचे सामान्य उदाहरण म्हणजे 'मराठी' शब्द रोमन लिपीत ' Marathi' असा लिहिता येतो, तर 'English' हा शब्द देवनागरीत 'इंग्लिश' असा लिहिता येतो. हे इतके परिचित आहे की आपल्याला त्याचे काही आश्चर्य वाटत नाही. वाणी शरीररचनेतून उत्क्रांत झाल्यामुळे तिचे उच्चारघटक सर्व मानसमूहांत जवळपास समान आहेत. वाणी हे नैसर्गिक माध्यम आहे.

याउलट लेखन हे हाताने आकृत्या खोदून, चितारून किंवा रेखून केले जाते. यात विविध बाह्य वस्तू व माध्यमे वापरली जातात. मूळ वाणीऐवजी आकृतिरूप

संकेत योजले जातात. या आकृत्यांची संख्या दोन (कारण केवळ एकाच आकृतीतून काहीच व्यक्त करता येत नाही !) इतकी कमी असू शकते उदा. गणकयंत्राची भाषा केवळ 0 व 1 या दोन वर्णांनीच बनते. आधुनिक उच्चारसदृश लिप्या 26 (रोमन लिपी) ते 64 (आर्यभाषा) वर्ण वापरतात. चित्रलिपीत 500-700 (इजिप्तमधील हिएरोग्लीफिक लिपी) वर्ण असू शकतात तर चिनी भाषेच्या चित्रलिपीत 40,000 वर्ण होते. म्हणजे उच्चाराच्या बाबतीत भाषांत वाणींमुळे एकवाक्यता असली तरी लेखनाच्या बाबतीत एकचिह्नता नाही.

2 ते 40,000 पर्यंत चिह्नसंख्या वापरात असताना, या सर्व चिह्नप्रणाली सारख्याच उपयुक्त आहेत काय ? असा प्रश्न साहजिकच मनात येतो. प्रत्येक भाषेला आपली चिह्नप्रणाली योग्यच वाटते. तुलनात्मक अभ्यास केल्यास मात्र विविध प्रणालींचे वस्तुनिष्ठ मूल्यमापन करता येते. गणकतंत्र 0 व 1 ही दोनच चिह्ने अंतर्गत व्यवहारासाठी वापरत असले तरी प्रत्यक्षात अशा चिह्नांचे गट करून ASCII ( American Standard Code for Information Interchange) किंवा आपल्याकडे ISCII (Indian Standard Code for Information Interchange) वापरले जाते. दोन चिह्नांचा सात वेळा उपयोग करून 2 x 2...x 2 सात वेळा = $2^7$ = 128 गट तयार होतात. हे गट लेखनवर्ण (A,B,C,.इ.) ,अंक (1,2,....) इ. विविध चिह्नांऐवजी वापरले जातात. हे म्हणजे 127 चिह्ने वापरण्यासारखेच आहे. केवळ यांत्रिक सोयीसाठी 2 वर्णांची सप्तके वापरली जातात. कीलकलिपी (Cuneiform) मध्येही अनेक सारख्या खुणांच्या गटांच्या आकृत्या वापरल्या जात. तसेच चित्रलिप्यांमध्ये चिह्ने कितीही असली तरी उच्चारवर्ण वाणीनेच मर्यादित होतात. जपानी भाषेने चिनी चित्रलिपी वापरली असली तरी 50 वर ध्वनिदर्शक खुणा (कतकन/हिरगन) निर्माण करून, पुढे त्यांची संख्या 72 पर्यंत नेण्यात आली. या खुणांचा क्रम संस्कृत व्याकरणावर आधारलेला आहे. आपल्या दृष्टीने ही वर्णमाला मोठी आहे असे नसून ही बाराखडी सारखी उच्चारमाला आहे.

चित्रलिपी अर्थानुगामी असल्यामुळे कुठल्याही भाषेसाठी वापरता येते परंतु प्रत्येक चित्राचा उच्चार वेगळा शिकावाच लागतो व तो कसा करावयाचा याची चित्रावरून अजीबात कल्पना येत नाही, त्यासाठी पूर्वज्ञानच लागते. याउलट वर्णलिपी ही शब्दानुगामी (म्हणजे उच्चाराधारित) असल्यामुळे उच्चार त्वरित समजतो. पण अर्थ निराळा शिकावा लागतो किंवा शब्दांचे पूर्वज्ञान लागते. लहान मूल, किंवा कदाचित पोपट पुष्कळशा वर्णांचे उच्चार करू शकतो, पण अर्थज्ञान नसल्यामुळे त्याला केवळ अर्थहीन उच्चार, किंवा पोपटपंची करता येते: लहान मूल झपाट्याने अर्थ समजून शब्द आत्मसात करते. पोपट मात्र आहे तसाच राहतो.

म्हणजे अंकांचा गणकयंत्रीय हीनमार्ग व चित्रांचा चीनदेशीय महामार्ग यांपेक्षा उच्चारवर्णांच्या आसपास लेखनवर्ण योजण्याचा भारतीय मध्यममार्गच उत्तम दिसतो. सर्व इंडो-युरोपीय भाषा या मार्गाने जातात. इंग्रजीची A,B,C, ही रोमन वर्णमाला व आपली अ..क... ही वर्णमाला यांचे उच्चाराशी नाते आहे. एखादा नवा शब्द ऐकून चिनी लिपीत कसा लिहावा याला कोशातच बघावे लागेल, पण नवीन इंग्रजी किंवा मराठी शब्द लिपिबद्ध करणे शक्य होते.

एकूण उच्चारवर्णांइतकेच लेखनवर्ण असण्याचा मध्यममार्ग योग्य दिसतो. यातही परत तारतम्य करता येते. उदा. इंग्रजीत नवीन शब्द उच्चारला तर पूर्वज्ञानाशिवाय त्याचे साधारण लिपिकरण (Spelling) कल्पिता येते, पण निर्दोष लेखनासाठी शब्दकोश पाहावा लागतो. याचे कारण स्पेलिंग व उच्चार तंतोतंत जुळत नाहीत. यामुळे स्पेलिंग पाठ करणे हा एक मोठा उद्योग होऊन बसतो. यात लेखनाला इतके महत्त्व येते, की उच्चाराशी त्याचे नाते असावे हेच विसरले जाते. परंतु मराठी किंवा इतर भारतीय भाषांत उच्चारित शब्द निर्दोष लिहिता येतो. या प्रत्येक भाषेत काही उच्चार - अपभ्रंश आहेत ते मात्र ध्यानात घ्यावे लागतात पण मराठी माणसाला बंगाली स्पेलिंग निराळे पाठ करावे लागत नाही. संस्कृतने मात्र या सर्वांवर कडी केली आहे ! प्रत्येक उच्चार व वर्ण यांचे एकास एक नाते आहे. उच्चारानुसार लेखन व लेखनानुसार उच्चार होतात. उच्चार नीट असला तर लेखन निर्दोष करता येते. भाषा शिकताना प्रथम उच्चारण शिकतो त्यावेळीच शुद्ध उच्चार शिकले तर पुढे शुद्धलेखन

येण्याचा पाया घातला जातो. मुळात बालपणी कुटुंबात होणाऱ्या संस्कारात शुद्धोच्चार शिकलेले चांगले. नंतर अक्षरमाला शिकली की आपण A,B,C,D, सारखे थांबत नाही तर अंकलिपीत बाराखडी म्हणजे व्यंजनस्वरसंयोग शिकतो यामुळे मराठी स्पेलिंग पक्के येणे शक्य आहे. पुढे जोडाक्षरांची भर पडते इतकेच. त्यामुळे एकदा शुद्ध उच्चार आले व उच्चारानुसार लेखन करण्यास शिकले की कुठल्याही भारतीय भाषेसाठी स्पेलिंग पाठ करावे लागत नाही. इंग्रजी इ. भाषांत शब्दकोषात प्रथम स्पेलिंग म्हणजे लेखन व नंतर ध्वनिसामी (Phonetic) स्पेलिंग म्हणजे उच्चार असे प्रत्येक शब्दासाठी दिलेले असते. शब्दकोष नसेल तर इंग्रजीसारख्या भाषेतले स्पेलिंग व उच्चार पाठच असावे लागतात. शब्दाचा अर्थ माहीत असला तरीही स्पेलिंग किंवा उच्चार यासंबंधी शंका असेल तर शब्दकोष बघावाच लागतो. याउलट भारतीय भाषांत कोषांचे प्रमाण कमी आहे. शैक्षणिक पुस्तकात कामापुरते नवीन शब्दांचे अर्थ दिलेले असतात व शब्दकोष हा लेखन किंवा उच्चार यासाठी नसून केवळ शब्दार्थासाठी असतो. ही सर्व सोय कशामुळे झाली आहे? संस्कृतचे उच्चारानुसार लेखन व भारतीय भाषांचे संस्कृतसारखे आचरण यांमुळे.

प्रमाण बोली : आधुनिक भाषा उच्चार गौण धरून लेखनाला महत्त्व देतात. त्यामुळे एकाच भाषेच्या अनेक बोली आढळतात. यांत एकाच शब्दरूपाचे वेगवेगळे उच्चार होऊ शकतात. त्यातीलच कुठलीतरी एक बोली सुशिक्षित, प्रबळ किंवा प्रगत समाजाची म्हणून प्रमाण धरली जाते व भाषा एकच असून बोलींमुळे उच्चनीचता निर्माण होते. म्हणजे लोकाभिमुख भाषेतही भेदभाव करावेच लागतात. यामुळेच बोली भाषा स्थलकालानुसार बदलते म्हणून टिकाऊ साहित्य लेखीच असले पाहिजे असा समज पसरला आहे.

संस्कृत प्रमाण : संस्कृतचे मात्र असे नाही. तिची एकच बोली आहे व ती 'शिक्षे' वरून समजते. संस्कृत भारतभर पसरली असली तरी दोन टोकांना राहणारे विद्वानही एकसारखे बोलू शकतात. संस्कृतमध्ये बोली नाहीत त्यामुळे संस्कृतमध्ये उच्चनीच भाव नाही. संस्कृत म्हणजे प्रक्रिया करून शुद्ध केलेली भाषा त्यामुळे अपभ्रंशांना वावच नाही. संस्कृतमध्ये निराळी प्रमाणबोली अमुक एका विभागातील अशी नाही. बोली संस्कृत ही सर्वत्र प्रमाणच असते. तिचे प्रमाणित्व स्थलातीत आहे. अपभ्रंश होतच नसल्यामुळे कालमानामुळे फरक पडण्याचाही प्रश्न नाही त्यामुळे ती स्थलकालातीत आहे. असे भाग्य आधुनिक भाषांच्या वाट्याला नाही. स्थलकालामुळे होणाऱ्या बदलांमुळे त्या अगतिक आहेत. प्रमाणितपणा टिकवून धरणे हे त्यांच्यापुढे एक मोठेच काम आहे. अशा भाषेत कुठल्याही मौखिक परंपरा टिकवणे हे हास्यास्पद ठरते. हाच न्याय सर्व मौखिक परंपरांना लावून त्या मागासलेल्या, बुरसटलेल्या, लेखन येत नसल्यामुळे, अशिक्षितपणामुळे मौखिक राहिलेल्या, अतएव त्याज्य असे आधुनिक उच्च शिक्षितांना वाटते. पण ते योग्य असेलच असे नाही.

वर चर्चिलेल्या घटकांवरून संस्कृतच्या निर्दोष मौखिक परंपरेची संगती लावता येईल. भाषा प्रमाणित नसेल, अनेक बोली असतील व त्या स्थलकालानुरूप भिन्न असतील तर मौखिक परंपरेवर विसंबून राहणे आत्मघातकीपणाचे ठरेल. त्यामुळे लेखनावरच भर देणे भाग होणार. सर्व आधुनिक भाषांना हे लागू आहे त्यामुळे पुस्तकी ज्ञानावर त्या सर्वांचा भर आहे. भाषा पुस्तकी झाली त्यामुळे शिक्षण हे भाषेवर आधारलेले असल्यामुळे सर्व शिक्षणातच वाणीचे महत्त्व कमी होऊन लेखन वाचनाचे वाढले आहे. याच्या परिणतीचे भौतिक स्वरूप म्हणजे बालशरीरांना वाहावी लागणारी प्रचंड दप्तरे! खरे पाहता भाषेतील दोषांचे ओझेच या दप्तरांच्या रूपाने वाहावे लागते.

संस्कृत मात्र प्रमाणित भाषा आहे. लेखन व उच्चार यांचा पूर्ण मेळ आहे. लेखी भाषेत बदल करायला परवानगी नाही कारण व्याकरणाचे नियम सदैव पाळावेच लागतात. तसेच उच्चार कधीही चुकीचे केलेले चालत नाहीत, त्यामुळे उच्चार नेहमी शुद्ध व प्रमाणितच असतात. प्रमाणित असल्यामुळे संस्कृत स्थलकालातीत आहे, अपभ्रंश होत नसल्यामुळे ती अजर आहे व जीर्ण होत नसल्यामुळे ती अमरही आहे. थोडक्यात ती अजरामर आहे. अशा भाषेत मौखिक परंपरा निर्माण केली तर उच्चार (शिक्षा) व शब्दरूपे (व्याकरण) प्रमाणित असल्यामुळे ती टिकून राहील.

संगीत भाषा : संगीत ही एक प्रकारची भाषा मानली तर 'शिक्षा' म्हणजे शुद्ध स्वर लावणे, 'व्याकरण' म्हणजे रागाचे नियम पाळणे व 'छंद' म्हणजे लयीचे बंधन पाळणे. हे असेल तर लेखनाचा आधार न घेता ही भाषा टिकू शकेल व तशी ती टिकलीच आहे. स्वरलिपीत पुस्तके मुख्यतः या शतकात छापली गेली व त्याने संगीत सामान्यांपर्यंत पोचले खरे, पण पोचले ते सामान्य संगीतच ठरले ! आता पुन्हा गुरुपरंपरेने कलाकार निर्माण करण्याचे प्रयत्न चालू झाले आहेत, म्हणजे मौखिक परंपराच पाळावी लागणार, कारण गुरू पाठ्यपुस्तके, टिपणे किंवा मार्गदर्शक यांवरून संगीत शिकवत नाहीत. यापासून संगीत किंवा संस्कृतच्याच नव्हे तर सर्वच शिक्षणाला धडा घेण्यासारखा आहे.

जननसंहिता : शिक्षा, छंद, व्याकरण यांनी नियमबद्ध केलेली भाषा व मौखिक परंपरा यांचा दृढ संबंध आपण पाहिला. आता आपल्या मूळ रूपकाप्रमाणे या शुद्धभाषेचा व जननभाषेचा संबंध पाहू. जननभाषेतील संहिता म्हणजे जननसंहिता (किंवा जननग्रंथ) ही गुणसूत्रांच्या स्वरूपात असते. गुणसूत्रे ही पेशीच्या शरीरावयवांशी निगडित असल्यामुळे त्यात भाषेचा नैसर्गिक व मूळ आविष्कार आहे. जसे मानवीभाषेतील बोली ही वाणीच्या माध्यमात असते, ती शरीराधिष्ठित असल्यामुळे नैसर्गिक असते म्हणून भाषेचे मूळ स्वरूप वाणी असते.

निर्दोष परंपरा : भाषेत निर्दोषपणावर म्हणजेच संस्कृतपणावर भर असेल तर वाणीवर आधारलेली मौखिक परंपरा लेखनाचा मुळीच उपयोग न करतात टिकू शकते व यानेच संस्कृतिसातत्य राहते. साहित्य व शेवटी संस्कृती ही भाषेवर आधारलेली आहे आणि भाषा ही संस्कृतोद्भव किंवा संस्कृतच असली पाहिजे. त्यामुळे संस्कृत टिकली तर भाषा टिकेल व त्यातूनच संस्कृती टिकेल. 'संस्कृतिः संस्कृताश्रिता' । असे म्हणतात ते उगीच नव्हे.

जननभाषेतील संहिता ही शारीरिक स्वरूपात साठविलेली असते जसे मौखिक संहिता मेंदूतील स्मरणात असते. मानवप्राणी अजरामर नाही त्यामुळे ही संहिता पुढल्या पिढीत संक्रमित केली पाहिजे. हे कार्य मौखिक परंपरेने होते यात वाणी व श्रवण या शरीराधिष्ठित व्यापारांचा उपयोग केलेला असतो. कोणत्याही बाह्य साधनावर अवलंबून राहावे लागत नाही. मौखिक संहिता एका डोक्यातून दुसऱ्या डोक्यात अशी हजारो वर्षे टिकू शकते. याचप्रमाणे जननसंहिता ही पेशीच्या केंद्रात म्हणजेच डोक्यात असते. परंतु पेशी ही सजीव असल्यामुळे संहिता पेशीच्या शारीरिक (भौतिकदृष्ट्या रासायनिक) प्रक्रिया वापरून पुढच्या पिढीतील पेशीच्या केंद्रात संक्रमित केली जाते. या प्रक्रिया निर्दोष असल्यामुळे संहिता बिनचूक एका पेशीतून दुसऱ्या पेशीत असे करीत पिढ्यानपिढ्या टिकून राहते.

दोन्ही भाषांत संहिता शारीरिक, नैसर्गिक पण निर्दोष प्रक्रियांचा वापर करून बाह्य साधनांच्याशिवाय संक्रमित होते. वंशसातत्य हे जननसंहिता टिकण्यावर अवलंबून आहे जसे संस्कृतिसातत्य हे संस्कृतसंहिता टिकण्यावर अवलंबून आहे. नैसर्गिक प्रक्रियांच्या क्षेत्रात मानवीभाषा व जननभाषा यातील निर्दोषपणाचे साधर्म्य आपण पाहिले. पुढील चवथ्या लेखात संहितेत व प्रतिरूपांत दोष निर्माण झाल्यावर काय होते याची तुलना पाहू.

●●●


*With Best Compliments*
*From*

APPU
LEASING CO. PVT. LTD.

*Regd. Off. :*
201, Chittatosh Apartment,
Opp. Binny's Show Room,
Jambli Naka, Thane (W) 400 601.
Tel. : 534 5846. Fax: 533 1568.

With Best Compliments

From

Rakesh Pandurang Gauri

Lakshmi Chhaya,
Opposite Municipal Garden,
Khargaon, Kalwa.
Thane.

# भारतीय वास्तुशास्त्राचा परिचय (१)

डॉ. रघुनाथ पु. कुलकर्णी

भारतीय वास्तुशास्त्राचा विषय जेव्हा जेव्हा म्हणून चर्चेस येतो, मग तो मित्रमंडळीत असो, किंवा एखाद्या स्थापत्यविषयक चर्चासत्रात असो, मुख्य मुद्दा जो नेहमीच पुढे येतो तो म्हणजे, भारतीय वास्तुशास्त्राच्या अभ्यासाने आजच्या स्थापत्यशास्त्रात काही भर घातली जाणे शक्य आहे का ? किंवा आधुनिक स्थापत्यशास्त्रात त्यामुळे प्रगती होणे शक्य आहे का ? जर एखाद्या विषयाचा समाजकारणाशी संबंध उरलेला नसेल किंवा एखाद्या विषयाचा अभ्यास हा आजच्या परिस्थितीत उपयुक्त नसेल, तर हा अभ्यास करावयाचे काही कारण नाही. आजच्या उपयुक्ततावादी लोकांना यासाठी काही सबळ कारण द्यावयास हवे.

एक गोष्ट येथे स्पष्ट करावयास हवी की आधुनिक स्थापत्यशास्त्र गेल्या ७०-८० वर्षात इतके पुढे गेले आहे, त्याची प्रगती इतक्या वेगाने झाली आहे की मध्ययुगकालीन भारतीय वास्तुशास्त्राचा अभ्यास त्याच्या आणखी प्रगतीस हातभार लावू शकेल असे वाटत नाही. एवढेच नव्हे तर आजचे कॉम्प्यूटरयुगातील स्थापत्यशास्त्र अशा प्रगतावस्थेत आहे की मध्ययुगीन भारतीय वास्तुशास्त्र त्याच्या पासंगासही पुरे पडू शकणार नाही. याला काही कारणे आहेत. एक महत्त्वाचे कारण असे की प्राचीन काळापासून मध्ययुगीन काळापर्यंत भारतीय वास्तुशास्त्री इमारतींच्या बांधकामाकरिता जे पदार्थ वापरीत असत, उदा. माती, दगड व लाकूड, ते सध्या आपण क्वचितच वापरतो. विटा, दगड अथवा लाकूड यांचा वापर इमारतींचा भार सहन करण्यासाठी पूर्वी करीत असत. त्यांच्या साह्याने भारतीयांनी पन्नास मीटर उंच एवढी प्रचंड देवालये व गोपुरे बांधली. तेव्हा या पदार्थांच्या गुणधर्मासंबंधी तसेच त्यांचा यथायोग्य वापर करण्यामध्ये भारतीयांनी आश्चर्यकारक प्रगती केली होती हे निःसंशय, पण हल्ली इमारतींचा भार सहन करण्यासाठी या वस्तूंचा क्वचितच उपयोग केला जातो. आधुनिक काळी इमारतींच्या बांधकामासाठी वापरावयाचा प्रमुख पदार्थ म्हणजे सिमेंट कॉंक्रीट, प्रबलित सिमेंट कॉंक्रीट (R.C.C.), तसेच प्रिस्ट्रेस्ड कॉंक्रीट. तेव्हा भारतीयांनी मध्ययुगकाळापर्यंत जे ज्ञान दगडाच्या किंवा विटांच्या इमारती बांधण्यासाठी वापरले ते आता उपयुक्त नाही.

दुसरा मुद्दा असा की कॉंक्रीट तयार करण्यासाठी लागणाऱ्या वाळू, खडी, सिमेंट व पाणी यांच्या निरनिराळ्या प्रमाणांनी हव्या त्या बलाचे ( Strength) कॉंक्रीट तयार करता येते. कॉंक्रीट मधील सिमेंटचे प्रमाण तसेच त्याची प्रत ( quality) ही बदलून देखील पाहिजे त्या ताकदीचे कॉंक्रीट तयार करता येते. तसे नैसर्गिक रीत्या उपलब्ध होणाऱ्या तयार पदार्थांच्या गुणधर्मांबद्दल म्हणता येत नाही. लाकूड, दगड यांचे गुणधर्म, त्यांचे बल ही निरनिराळी असू शकतात. पण त्यावर मानवाची हुकुमत नाही. लाकूड, दगड, माती ही जेथे जशी असतील तशी घेऊन इमारत बांधावी लागते. विटा देखील मानवनिर्मित खऱ्या, पण त्यांचेही गुणधर्म फारसे बदलता येत नाहीत. एवढेच नव्हे तर लाकूड, दगड यांच्यात बाह्यतः दिसून न येणारे काही दोष असतील तर ते हुडकून काढणे अवघड, समजून आले तरी ते नाहीसे करता येत नाहीत, व त्यांच्या गुणधर्मात पाहिजे तसा बदल करता येत नाही. एकतर तो सदोष पदार्थ स्वीकारून त्याचा योग्य त्या ठिकाणी विनियोग करणे किंवा तो न वापरणे हे दोनच पर्याय आहेत. आज वापरत असलेला कॉंक्रीट हा पदार्थ पूर्वी इमारतींसाठी वापरत असलेल्या पदार्थांपेक्षा वेगळा आहे. त्याचे बल व इतर गुणधर्म अचूक माहीत असतात, या शिवाय त्याच्या गुणधर्मात यथायोग्य बदल करणे शक्य असते.

अगदी मध्ययुगकाळापर्यंत इमारत, मुख्यतः दगडाची इमारत, बांधताना दगड केवळ एकमेकांवर ठेवून इमारत बांधत असत. त्या दगडांना जोडण्यासाठी चुना किंवा तत्सम कुठलेच बंधकद्रव्य त्या काळी वापरीत नसत. तेव्हा या दगडी इमारती बांधताना त्यांत ताण प्रतिबल (Tension Force) निर्माण होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक असे. इमारतीचा पाया एका बाजूला काही

कारणाने खचला तर इमारतीच्या विरुद्ध बाजूस ताण प्रतिबल निर्माण होऊन इमारत पडण्याचा धोका येथे असतो. त्यामुळेच दगडाच्या देवालयाचा पाया हा खूप खोल, शक्य तो जमिनीखालील दगडाच्या थरापर्यंत घ्यावा असे त्यावेळचे शिल्पशास्त्रावरील ग्रंथ सांगतात. त्या शिवाय देवालयांचे जोते, अधिष्ठान, हे भल्या मोठ्या दगडांचे भरीव बांधत असत. या उलट प्रबलित सिमेंट कॉंक्रीट वापरल्याने इमारतीत ताण प्रतिबल निर्माण झाले तर त्याचा प्रतिकार करणे शक्य असते. किंबुहना ताण प्रतिबलाची मात्रा किती असेल ते जाणून घेऊन त्या प्रमाणात पोलादाच्या सळ्यांचा वापर ठरविणे देखील शक्य असते. दगड, विटा यांच्या वापरात यामुळे जी मर्यादा येते ती प्रबलित कॉंक्रीटच्या वापरात जवळ जवळ नाहिशी होते. किंबहुना दगड, विटा यांच्या अचूक रीत्या माहीत न होणाऱ्या बलविषयक गुणधर्मांमुळे ताणबल अजीबात निर्माण होऊ नये याची मर्यादा असल्याने पूर्वीच्या स्थपतींनी नियम घालून दिला आहे, की देवालयाची अथवा गोपुरांची उंची शंभर हातांपेक्षा म्हणजे जवळ जवळ पन्नास मीटर पेक्षा जास्त असू नये. या उलट आधुनिक स्थपती प्रबलित कॉंक्रीटच्या शंभर ते दीडशे मीटरपर्यंत उंचीच्या इमारती बांधण्यात यशस्वी होतो, त्याचे कारणही हेच आहे.

आधुनिक स्थापत्य शास्त्राच्या प्रगतीची याही पुढील पायरी म्हणजे कोणत्याही वास्तूच्या कोणत्याही अवयवावर किती भार येणार आहे, किती ताण प्रतिबल येणार आहे याचा गणिती रीतीने केलेला उलगडा. एखादी वास्तू बांधावयाची असली म्हणजे आधुनिक स्थपती, त्या वास्तूच्या स्वतःच्या वजनाची, त्याचप्रमाणे तिच्यावर जे निरनिराळे दाब व ताण प्रतिबले येतात त्यांची अचूक जाण ठेवून त्या वस्तूच्या स्थैर्याबाबत गणिताने खात्री करून घेतो. ही स्थापत्यशास्त्राच्या प्रगतीमध्ये मोठीच उडी आहे.

या बाबतीत एका गोष्टीचा उलगडा मात्र होत नाही. भारतीयांनी विजापूर येथील गोलघुमट, ताजमहालचा घुमट या आधुनिक वास्तुशास्त्रज्ञालाही आश्चर्याने अचंबित करतील अशा प्रचंड वास्तू शास्त्रशुद्धरीत्या कशा बांधल्या हे एक मोठे कोडे आहे. आधुनिक स्थापत्य शास्त्राच्या गणिती रीतीने या प्रचंड घुमटांचे संकल्पचित्र (design) तयार करताना असे दिसून आले आहे की पूर्वीच्या या भारतीय स्थपतींनी हे जे घुमट बांधलेत ते या संकल्पचित्रांशी मिळतेजुळते आहेत. आधुनिक संकल्पचित्रे करावयाच्या पद्धतींची माहिती नसतानाही भारतीय वास्तुशास्त्री हे घुमट यशस्वीपणे करू शकले ही प्रत्येक भारतीयाला अभिमानास्पद गोष्ट आहे, आणि हेच भारतीय वास्तुशास्त्राचे वैशिष्ट्य आहे.

आणखीही एका पैलूचा याबाबतीत विचार व्हावयास हवा, तो म्हणजे आधुनिक काळी यंत्रांमध्ये झालेली प्रचंड सुधारणा. मोठमोठ्या अवजड यंत्रांच्या साह्याने वास्तूचे बांधकाम करणे नुसते सोपेच झालेले नसून तिच्या बांधकामात फार मोठा वेग आलेला आहे. पूर्वीच्या काळी एखादे तंजावर येथे असलेल्या बृहदीश्वरासारखे भव्य देवालय बांधावयाचे असेल तर त्याला दहा-बारा वर्षे लागत. आज आधुनिक यंत्रांच्या साह्याने तेच काम वर्षसहामहिन्यात पुरे करणे शक्य झाले आहे. अर्थात जेव्हा अशी अवजड यंत्र- सामग्री उपलब्ध नव्हती, त्या काळी बृहदीश्वरासारखे बारामजली देवालय बांधणे हे मोठे धाडसच म्हणावयास हवे, व चिरकाल टिकण्यासाठी यशस्वीरीत्या ते बांधकाम पुरे करणे हे जगातील एक महदाश्चर्यच म्हणावे लागेल. तरी देखील आधुनिक स्थापत्यशास्त्राच्या प्रगतीला मध्ययुगीन काळच्या भारतीय वास्तुशास्त्राच्या अभ्यासाने काही हातभार लागू शकेल असे वाटत नाही.

मात्र भारतीय वास्तुशास्त्राबाबत अभिमानास्पद गोष्ट म्हणजे त्या त्या काळी भारतीय वास्तुशास्त्र पश्चिमेकडील देशांच्या वास्तुशास्त्रापेक्षा बरेच जास्त प्रगतावस्थेत होते. यासाठी देखील भारतीय वास्तुशास्त्राचा इतिहास हा केवळ भारतीय दृष्टिकोनातूनच नव्हे तर जागतिक दृष्टीने देखील अभ्यासाचा विषय असावयास हवा.

आतापर्यंत पाश्चात्य विद्वानांचे मत असे होते की सिंधुसंस्कृतिकालीन मोहन्जो-दारो, हराप्पा इत्यादी शहरे ही भारतीयांनी बांधली व आर्य लोकांच्या टोळ्या बाहेरून येऊन त्यांनी ही शहरे नेस्तनाबूत केली. परंतु नवीन संशोधनांती व पुढे आलेले जे नवीन पुरावे आहेत त्यावरून भारतीय तसेच अनेक पाश्चात्य विद्वानांचे मत या विषयी बदलू लागले आहे. सिंधुसंस्कृती-काळचे भारतीय आर्यच

होते, ते बाहेरून वगैरे आलेले नाहीत व ऋग्वेदात, प्राचीन भारतीय वाङ्मयात जी इंद्राने शहरांचा नाश केल्याची वर्णने आहेत, इंद्राला पुरभिद् म्हटले आहे, ती शहरेही आर्यांचीच होती. थोडक्यात ती आर्यांच्या परस्परांमध्ये झालेल्या युद्धांची वर्णने आहेत. या मताला अनेक पैलू आहेत. परंतु असे समजावयास हरकत नसावी की भारतीय आर्य हे प्रगत सिंधुसंस्कृतीचा नाश करणारे नसून त्या संस्कृतीचाच भाग होते. व ती वर्धिष्णू ठेवण्यात त्यांचा प्रामुख्याने हातभार होता.

ऋग्वेदाचा काल इ.पू. १४०० नसून तो इ.पू. ६००० किंवा इ.पू. ४००० असावा याबद्दल बऱ्याच विद्वानांचे आता एकमत झाले आहे. अथर्ववेदात, जो अर्थातच अत्यंत प्राचीन वेदग्रंथ आहे, एक 'शालासूक्त' आहे. त्यात घराची स्तुती केली आहे. या सूक्तावरून असे दिसून येते की त्यावेळची घरे बरीच मोठी असत. कमीत कमी चारपाच तरी खोल्या त्या घरात असत. घरातील पुरुषांसाठी एक दालन व स्त्रियांसाठी वेगळे दालन असे. त्यांच्या झोपण्यासाठी वेगळ्या खोल्या असत. पवित्र अग्नीसाठी पुन्हा एक वेगळी खोली असे, जेथे घरातील कर्ता पुरुष आपल्या पत्नीला बरोबर घेऊन होमहवन करीत असे. या शिवाय पाणी साठ वणीची म्हणून एक वेगळी खोली असे. अंगणामध्ये पाणी साठविण्यासाठी, कारंजे असलेला हौद असे. घराला अर्थात अंगण असून ते फुलावर आलेल्या दुर्वांनी भरून गेलेले असे. शालासूक्ताची ही सुरुवात मोठी काव्यात्मक आहे.

आयने ते परायणे दुर्वा रोहन्तु पुष्पिणीः ।

उत्सो व तत्र जायतां ह्रदो वा पुण्डरीकवान् ॥

घराच्या अंगणात कारंजे असावे व जवळपास कमल पुष्पांनी भरलेले तळे (बंगाली पुकुर) असावे असे हा ऋषी म्हणतो.

याउलट अथर्ववेदकाळीच काय परंतु सिंधु-संस्कृतीच्या काळी देखील पाश्चात्य देशातील मानव, कपड्यांची जाणीव नसलेला व आडोसा म्हणजे काय याची कल्पना देखील नसलेला असा हिंडत असे.

दुसरे अधिक अलीकडचे उदाहरण द्यावयाचे तर ते 'काटकोन त्रिकोणाच्या कर्णावरील चौरसाचे क्षेत्रफळ त्या त्रिकोणाच्या इतर दोन बाजूंवरील चौरसांच्या क्षेत्रफळांच्या बेरजे इतके असते', या सिद्धांताचे. या सिद्धान्तास पाश्चात्यांचे आंधळे अनुकरण करून आपण 'पायथागोरसचा सिद्धान्त' म्हणतो. वास्तविकतः यास 'बोधायन सिद्धान्त' म्हणावयास हवे.

वेदांच्या नंतर ब्राह्मणग्रंथांची निर्मिती झाली. या ग्रंथांत निरनिराळे यज्ञ कसे करावेत याची माहिती दिली आहे. परंतु पुढे पुढे हे यज्ञाचे तंत्र इतके विस्तारित व जटिल होऊ लागले की त्या प्रत्येक यज्ञाची माहिती ही थोडक्यात, सूत्ररूपाने लिहिली गेली. ही माहिती असलेल्या ग्रंथांना श्रौतसूत्रे म्हणतात. किंबहुना सूत्रग्रंथांची रचना हे भारतीय वैशिष्ट्य आहे. इतर कोणत्याही क्षेत्रांत तसेच भाषेत अशी वैज्ञानिकदृष्ट्या अचूक व अर्थवाही सूत्ररचना केली गेलेली नाही. या श्रौतसूत्रांत शेवटला अध्याय हा यज्ञातील अग्नि-कुंडे, वेदी, मंडप वगैरेंची आखणी कशी करावी याची माहिती देणारा असतो; व ही आखणी शास्त्रशुद्ध पद्धतीने करण्यासाठी ज्या भौमितिक सिद्धांतांची, रचनांची माहिती आवश्यक असते ती देखील दिलेली असते. बोधायनांचा काळ, ऋग्वेदाचा काळ इ.पू. १४०० घेतल्यास, इ.पू. ८०० येतो. परंतु आधुनिक संशोधनाच्या निकषाने ऋग्वेदाचा काळ इ.पू. ४००० ठरविला गेल्याने बौधायन श्रौतसूत्रांचा काळ इ.पू. २००० ते १४०० असा असावा. या अतिप्राचीन श्रौतसूत्रग्रंथांत बोधायनांनी हा काटकोन त्रिकोणाचा सिद्धांत दिला आहे. एवढेच नव्हे तर या सिद्धान्ताचा उपयोग करून, दिलेल्या सरळ रेषेला लंबरूप सरळ रेषा जमिनीवर कशी आखावी त्याच्या अनेक पद्धती दिल्या आहेत. याउलट पायथागोरस हा इ. पू. पाचव्या शतकात होऊन गेला, शिवाय हा सिद्धांत त्याने स्वतंत्रपणे शोधला नसून तो भारतीयांकडून शिकून घेतला असावा असे म्हणण्यास जागा आहे, कारण पायथागोरस भारतात येऊन राहून गेला होता अशी माहिती मिळते. तेव्हा भारतीयांनी या तथाकथित 'पायथागोरस सिद्धांता'स 'बोधायन सिद्धांत' संबोधिले पाहिजे, तसेच जागतिक स्तरावरही बोधायनांच्या नावाने तो ओळखला जावा यासाठी प्रयत्न करावयास हवेत.

याच बोधायनांनी आपल्या श्रौतसूत्रांत $\sqrt{२}$ ची

किंमत मालारूपाने (in series form) दिली आहे.

$$\sqrt{२} = १ + \frac{१}{३} + \frac{१}{३ \times ४} - \frac{१}{३ \times ४ \times ३४}$$

या पध्दतीने √२ ची किंमत दशांश चिह्नानंतर सहाव्या आकड्यापर्यंत अचूक येते. बोधायनांनी √२ ची ही किंमत या स्वरूपात कशी मिळविली असेल त्याचा उलगडा पुढील लेखात देऊ. पण त्या अगोदर वाचकवर्गाने आपापल्या कल्पना लढवून √२ च्या या किमतीचे कोडे सोडवून पाहण्याचा प्रयत्न करावयास काहीच हरकत नाही. भारतीय वैदिक भूमिती संबंधी अधिक माहिती पुढे केव्हातरी, वाचकांची आवड लक्षात घेऊन, देऊ.

कोठल्याही वास्तूची, ती बांधण्यापूर्वी जमिनीवर आखणी करणे हे स्थपतीचे काम असते. वास्तूची आखणी करताना जर एखादी चूक राहून गेली तर त्या प्रमाणात ती वास्तू कमकुवत होते, व तिचे आयुष्य त्या मानाने कमी होते. आखणी अचूक व दोषरहित होण्यासाठी भूमितिशास्त्राची गरज असते, म्हणून भारतीयांच्या वास्तुशास्त्र विषयक प्रगतीचे उदाहरण देताना भूमितीतील भारतीयांच्या प्रगतीसंबंधी माहिती दिली आहे.

हीच गोष्ट विष्णुगुप्त ऊर्फ कौटिल्य याने लिहिलेल्या 'अर्थशास्त्र' बाबत दिसून येते. या ग्रंथात अनेक विषयांसंबंधी दिलेली माहिती, भारतीय त्या काळी अनेक शास्त्रांत इतर देशांपेक्षा कितीतरी प्रगतावस्थेत होते, असे दाखविते. असा ग्रंथ इ.पू. ४०० वर्षे इतक्या प्राचीन काळी लिहिला जाऊ शकतो या बद्दल पाश्चात्य विद्वानांनी, नेहमी प्रमाणे अविश्वास व्यक्त केला होता. या पुस्तकात सोने शुध्द करण्यासाठी जी cupellation पद्धत दिली आहे ती पाश्चात्यांना इ.स. दहाव्या शतकात देखील माहिती नव्हती.

वरील उदाहरणांवरून भारतीयांचे वास्तुशास्त्र-विषयीचे ज्ञान, त्या त्या काळी जगाच्या फार पुढे गेलेले होते याबद्दल संशय राहत नाही . अशी अनेक उदाहरणे देता येतील. मात्र मध्ययुगानंतर भारतीयांची ज्ञानाबद्दलची ओढ, संशोधनातील प्रगती ही सर्व ठप्प झाली. त्याची कारणे माहीतच आहेत. मात्र तो या लेखाचा विषय नाही.

भारतीय वास्तुशास्त्राच्या अभ्यासाची गरज का आहे ते वर दिलेल्या मुद्द्यांवरून लक्षात आलेच असेल. पण या विषयासंबंधी श्री. पु. ल. देशपांडे यांनी अपूर्वाईत एक प्रसंग वर्णिला आहे, त्याची आठवण झाल्याखेरीज राहत नाही.

दुसरे महायुद्ध सुरू झाल्यानंतर, इंग्लंडमधील ऑक्स्फर्ड या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना विद्यार्जनाचे काम सोडून हाती बंदूक घेऊन लढण्याची तयारी करावी लागली. त्या वेळेला हे विद्यार्थी त्यांच्या लढाईच्या नेमणुकीच्या ठिकाणी जाण्यापूर्वी आपल्या ऑक्स्फर्ड विद्यापीठातल्या आवडत्या प्राचार्यांची निरोपाची म्हणून भेट घेण्यास गेले. त्यावेळेला त्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांना उद्देशून केलेले भाषण विसरणे अशक्य आहे. ते प्राचार्य म्हणाले की 'तुम्ही तरुण मंडळी युद्धावर का जात आहात याची तुम्हाला जाणीव आहे का ? तुमच्यापैकी काहीजण परत येणार देखील नाहीत. तेव्हा हा सर्वस्वाचा त्याग तुम्ही कशाकरिता करीत आहात ? तर त्याचे उत्तर असे की तुम्ही आपल्या देशाच्या संस्कृतीच्या संरक्षणासाठी युद्धाला जात आहात. जगाच्या संस्कृतीवर दुष्ट प्रवृत्तींनी घाला घातला आहे, तो परतविण्यासाठी तुम्ही सज्ज झाला आहांत'. संस्कृतिसंरक्षण हा मानवाचा मानबिंदू आहे, आणि ते संरक्षण करणे हे मानवाचे कर्तव्य आहे. परंतु संस्कृती म्हणजे काय ? तर आपल्या पूर्वजांविषयीच्या ज्ञानाचा ठेवा म्हणजे संस्कृती. तेव्हा तो ज्ञानाचा ठेवा जतन करण्यासाठी, त्यात आवश्यक ते यथायोग्य संशोधन होण्यासाठी त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. भारतीय वास्तुशास्त्राचा हा जो आपल्या पूर्वजांकडून मिळालेला अभिमानास्पद वारसा आहे, त्याचा अभ्यास करणे हे आपले कर्तव्य नाही का ?

●●●

# धर्म आणि शिक्षण

श्री. मोरेश्वर दि. पराडकर

प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पाइकांनी फार जुन्या काळापासून धर्म व तत्वज्ञान या विषयांवर चिन्तन केलेले आहे. धर्म शब्दाच्या अर्थाविषयी गेल्या ९० वर्षात सुधारक आणि सनातनी यांच्यामध्ये बरीच उलटसुलट चर्चा झालेली आहे. यात 'धारणाद् धर्म इत्याहुः धर्मो धारयते प्रजाः' 'आचार प्रभवो धर्मः' 'एषधर्मः सनातनः' यांसारख्या वचनांचे चर्वितचर्वण बरेच झालेले आहे. या चर्चेच्या बुडाशी ब्रिटिश राजसत्तेच्या आधाराने वेगाने प्रसृत होणारा तथाकथित मानववादी ख्रिश्चन धर्म आणि झोंडशाहीच्या जगात व भारतातही तथाकथित जातिभेदरहित, व उच्चनीचतारहित पसरणारा मुस्लिम धर्म हे होते. जगात 'हिंदु धर्म' तेवढाच 'पोथीनिष्ठ' हे गृहीत धरून हिंदूधर्मावर - आचारांवर, परमेश्वरावरील श्रद्धेवर कठोर टीका होते; 'परमेश्वराला रिटायर करा' असे सांगणारे विचारवंत (?)आपल्याकडे आहेतच. 'एष धर्मः सनातनः' असे म्हणणाऱ्या व्यासांना मात्र जो धर्म अभिप्रेत होता त्यात अभ्युदय आणि निःश्रेयस या दोन्ही गोष्टी प्राप्त करून देण्यात साहाय्य करणाऱ्या धर्माची कल्पना होती. व्यासांच्या काळी इतर धर्म अस्तित्वात नव्हते असे मानले पाहिजे, म्हणून त्यांनी 'हिंदू' हे विशेषणही वापरलेले नाही. धारण म्हणजे अस्तित्व आणि पोषण म्हणजे 'मला देह आहे, मन आहे' या जाणिवेसह शरीराची व मनाची वाढ किंवा संवर्धन करणे या गोष्टी धर्मात समाविष्ट आहेत. किंबहुना अशा रीतीने जगणाऱ्या व्यक्तीला आणि समाजालाच व्यक्तिमत्त्व प्राप्त होत असते. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांपैकी शेवटच्या दोन नियतीच्या हातात असतात, व मधली स्थिती मात्र मनुष्याच्या किंवा समाजाच्या अधीन असते. अस्तित्व प्राप्त झाल्यावर ते टिकवणे व त्याचा विकास करणे हे मान्य केले पाहिजे. व्यक्ती समाजाशी निगडित असते आणि व्यक्ती व समाज यांची जडण -घडण व अस्तित्व निसर्गावर (यात देश, काल व परिस्थिती यांचा समावेश असतो.) अवलंबून असते. या निसर्गाचे स्वयंसिद्ध धर्म म्हणजे गुणविशेष असतात. यांनाच नियती (नियमयति इति) असे नांव आहे. या दृष्टीने नियती हा प्राणिमात्राच्याच नव्हे तर वस्तुमात्राच्या अस्तित्वाचा नियन्ता असतो.

म्हणूनच निसर्गाच्या नियमांना धरून असते ते नैसर्गिक जीवन, आणि निसर्गावर विजय मिळवण्याच्या महत्वाकांक्षेने निसर्गाचे नियम झुगारून जगलेले जीवन हे अनैसर्गिक किंवा कृत्रिम जीवन. यात अर्थातच निसर्गातील समतोल सांभाळण्याचा प्रयत्न नसतो; यामुळे आज पर्यावरणाच्या समस्या निर्माण झालेल्या आहेत.

निसर्ग आणि त्यात होणारे बदल यांचे प्रदीर्घ काल अवलोकन करून, त्यांचे मानवी जीवनावर होणारे अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम यांचा अभ्यास करून, व्यक्तीने कसे जगावे या सम्बन्धी जे नियम प्राचीन महर्षींनी ठरवले ते नियम म्हणजेच धर्म. निसर्गातल्या या नियमबद्धतेची जी जाणीव वैदिकांना झाली त्या विश्वव्यापी जाणिवेची अभिव्यक्ती 'ऋत' या कल्पनेत सामावलेली आहे. या ऋतांतून सुटका मानवांप्रमाणे देवांनाही नाही कारण, जे 'ऋत' नाही ते 'अनृत', विश्वाच्या स्वयंपूर्ण नियमबद्धतेला बाधा आणणारे म्हणून अकल्याण करणारे, अशी त्यांची धारणा होती. मानव हा सृष्टीतला सर्वोत्तम घटक हे त्यांना मान्य होते हे 'मानुषात्र परं किञ्चित् सा काष्ठा सा परा गतिः' या महाभारतातील वचनावरून स्पष्ट होते. परंतु त्यानेही ऋताचा पाठपुरावा करावयास हवा असा त्यांचा आग्रह होता. म्हणूनच त्याचा धर्म वैयक्तिक व सामाजिक अशा दोन्ही कर्तव्यांचा समाहार करणारा हवा. खाजगी आणि सामाजिक जीवन यांमध्ये फारकत करणे म्हणजेच कप्पे पाडून जीवनाचा विचार करणे त्यांना पसन्त नव्हते. म्हणूनच मनुष्याच्या धर्मात त्याच्या जन्मापासून मृत्यूपर्यंतच्या सर्व जबाबदाऱ्या योग्य रीतीने पार पाडण्याची व्यवस्था होती, इतकेच नव्हे तर मृत्यूनंतरही बहुसंख्य मनुष्यांचे जीवन संपत नसून त्याला एक निराळे परिमाण लाभते असा त्यांचा विश्वास होता. असे नियम पाळणाऱ्या व्यक्तींचा समाज स्वाभाविकपणेच एकात्म किंवा एकसंध होतो आणि एकसंधतेतूनच राष्ट्रीयत्वाची, एकराष्ट्रीयत्वाची भावना उत्पन्न होते. ही अमूर्त कल्पना साकार व समृद्ध करण्याकरता

व्यक्तीला व समाजाला आपल्या अस्मितेला थोडी मुरड घालावी लागावी हे समजण्यासारखे आहे. हे नियम किंवा आचार म्हणजेच धर्म. थोडक्यात व्यक्तीला किंवा समाजाला अस्तित्वासाठी व विकासासाठी काही अत्यावश्यक बन्धने पाळावी लागतात; त्यांनाच 'धर्म' ही संज्ञा दिलेली आहे.

या ठिकाणी लिखित किंवा अलिखित नियम म्हणजे 'धर्म' नव्हे; हे नियम मार्गदर्शक असतात. या नियमांप्रमाणे वागणे म्हणजे 'धर्म', म्हणूनच 'आचारप्रभवो धर्मः' असे म्हटलेले आहे. धर्मप्रतिपादक ग्रंथाची पूजा करणे म्हणजे धर्म नव्हे; तशी पूजा करणारा खऱ्या अर्थाने 'धार्मिक' नव्हे; त्याप्रमाणे आचरण करणाऱ्यालाच धार्मिक म्हणता येईल. या दृष्टीने 'केवलं शास्त्रमाश्रित्य न कर्तव्यः धर्मनिर्णयः' हे बृहस्पतिस्मृतीचे म्हणणेच समर्पक आहे. हे सर्व लक्षात घेऊन व्यक्तीची वैयक्तिक व समाजाची सामाजिक अस्मिता आणि उत्कर्ष यांचा समतोल साधणारे आचरण म्हणजे धर्म असे सांगणाऱ्या महर्षि व्यासांच्या काळी 'आस्तिक' (म्हणजे दृश्यमान विश्वापेक्षा वेगळी शक्ती विश्वाची निर्मिती आणि नियंत्रण करते असे मानणारा) आणि 'नास्तिक' (म्हणजे असे नियंत्रण करणारी शक्तीच नाही असे मानणारा-न अस्ति न मनुते इति ) असे दोनच धर्म अस्तित्वात होते आणि आजही निराळ्या नावांनी तेच अस्तित्वात आहेत हे उघड आहे.

तात्पर्य, मानवाच्या व समाजाच्या सर्व अंगांना स्पर्श करणाऱ्या नैतिक तत्त्वाचा- 'ऋत'चा साक्षात्कार वेदसंहितांच्या काळातच झालेला होता. नंतरच्या ब्राह्मण-ग्रंथांच्या काळात यज्ञसंस्थेच्या विस्तारामुळे धर्मातल्या भावनेचा लोप होऊन त्या जागी कर्मठता आणि शुष्कता आली हे खरे, परंतु मूलतः नैतिक कल्पना नामशेष होऊ शकल्या नाहीत. म्हणूनच ऐतरेय ब्राह्मणात ऋषिऋण, देवऋण आणि पितृऋण ही तीन ऋणे घेऊनच मनुष्य जन्माला येतो म्हटले आणि शतपथ ब्राह्मणात (१-७.२(१.६) ) मनुष्यऋण या चौथ्या ऋणाची भर घालून मानवतेचे ऋण सर्वांशी दयाळूपणाने वागून फेडणे योग्य असे म्हटले. हा आधुनिक मानवतावादाचाच ओनामा नव्हे का ? ही सर्व ऋणे फेडून ऋणमुक्त जीवन म्हणजेच यशस्वी जीवन हा विचार आजच्या कर्तव्यवादी (deontological) नीतिशास्त्राला मान्य होण्यासारखाच आहे. विद्यार्जन आणि विद्यावर्धन करून ऋषिऋण फेडावयाचे, धर्मकृत्ये (त्या काळी यज्ञयागादी) करून देवऋण फेडावयाचे, वंशविस्तार करून पितृऋणातून मुक्त व्हावयाचे आणि सर्व माणसांच्या सुखसोयींकडे यथाशक्ति लक्ष देऊन मानवऋणातून मुक्त होण्याचा प्रयत्न करावयाचा हा विचार सनातन, व कुठल्याही युगात अनुकरणीयच आहे. वरील ऋणांपैकी देवऋणाच्या कल्पनेतील, मानवाचे एकंदर सृष्टीशी व निसर्गाशी अभेद्य नाते जोपासून निसर्गातील समतोल साधण्याचा विचार तर आजच्या पर्यावरणवाद्यांनाही मान्य होण्यासारखा आहे.

ऋण कल्पना प्राचीन असेल परंतु आधुनिक युगातही नैतिक दृष्ट्या मानवाच्या सामाजिक बांधिलकीकडे निर्देश करणारी आहे. वैदिक युगानंतर निर्माण झालेल्या धर्मशास्त्राच्या भारतीय विचारवंतांनी ऋषिऋण, देवऋण व पितृऋण फेडल्याशिवाय मनुष्याला वैयक्तिक मोक्षाची आराधना करता येणार नाही. असा दण्डक घालून दिला. ज्या मनुस्मृतीवर आज आग पाखडली जाते त्या मनुस्मृतीने 'ऋणानि त्रीण्यनपाकृत्य मोक्षं सेवमानः व्रजत्यधः' म्हणजे 'तीन ऋणे फेडल्याशिवाय मोक्षाची कांस धरणारा अधोगतीला जातो' अशी धमकी दिलेली आहे. याचा अर्थ मनूसारखे स्मृतिकार मनुष्याची सामाजिक बांधिलकी मानणारे होते. माणसाच्या आयुष्याची, वयोमान व विचारांची प्रगल्भता या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन चार आश्रमात विभागणी करून आश्रमानुरूप कर्तव्ये निश्चित करण्याची कल्पनाही लक्षणीयच नव्हे तर आजही अनुकरणीय मानावी लागेल. कामसूत्राचा प्रणेता वात्स्यायन सुद्धा 'बाल्ये विद्याग्रहणादीनर्थान्', 'कामं च यौवने' आणि 'स्थाविरे धर्मं मोक्षं च' अशी सूत्रे लिहून आश्रमानुरूप कर्तव्यांवर जोर देतो हे उल्लेखनीयच आहे. ब्रह्मचर्य आणि गार्हस्थ्य या दोन आश्रमांत सामाजिक दृष्टीने यथाशक्ति ऋणमुक्त होऊन 'आता उरलो उपकारापुरता' या भावनेने जगावयाचे म्हणजे कामनांवर नियंत्रण ठेवून त्यांचे उदात्तीकरण करावयाचे आणि शेवटच्या आश्रमात पूर्ण संन्यस्त होऊन 'शेवटचा दिस गोड व्हावा' या दृष्टीने स्वतःचे कल्याण साधावयाचे म्हणजेच 'ब्रह्मानंदी लागली टाळी । आता देहाते कोण

सांभाळी' ही अवस्था प्राप्त करून घ्यावयाची या विचारातील प्रगल्भता आजही लक्षणीयच आहे.

धर्माच्या या भव्योदात्त कल्पनेवर भारतातील प्राचीन शिक्षणाची उभारणी झालेली होती. 'विद्येनेच मनुष्या ये श्रेष्ठत्व या जगामाजी ' यावर प्राचीन शिक्षणतज्ज्ञांचा दृढ विश्वास होता म्हणून ब्रह्मचर्याश्रमात त्यांचा विद्यार्जनावर जोर देऊन सर्वांना म्हणजे राजपुत्र आणि सामान्य विद्यार्थी, कृष्ण आणि सुदामा यांनाही आश्रमात समानत्वाची वागणूक देण्याचा दण्डक तत्कालीन सांदीपनीसारख्या ऋषींनी कटाक्षाने पाळला. या शिक्षणात शारीरिक श्रमाचे महत्त्व, निसर्गाचे सान्निध्य यांचा अन्तर्भाव होता. इतकेच नव्हे तर विषयांची विविधता ६४ कलांच्या उपासनेने नटलेली होती. आश्रमांप्रमाणे बौद्ध विहारांतही वेदांच्या अध्ययन - अध्यापनाला मज्जाव नव्हता भारतातल्या प्राचीन गुणशीला सारख्या विद्यापीठात स्त्रियांना उत्तम शिक्षण देऊन त्यांच्या गुणांचा विकास आणि शीलाचे संवर्धन केले जात होते. या विद्यापीठातील विषयांचे वैविध्य आजच्या हुशार विद्यार्थिनींनाही विकल्पांच्या बाबतीत लाजविणारे आहे.

प्राचीन काळी शूद्रांना शिक्षण दिले जात नव्हते व ब्राह्मणांनी त्यांना शिक्षणापासून वञ्चित केले होते असे विधान सरसकटपणाने केले जाते, परंतु यात सत्याचा अपलाप अधिक आहे. स्मृतींच्या काळात शिक्षणाचे तीन प्रकार होते : लौकिक, वैदिक आणि आध्यात्मिक. यापैकी आध्यात्मिक शिक्षण सार्वत्रिक असण्याचा प्रश्न आजही निर्माण होत नाही; कारण त्यात शिकणाऱ्याच्या प्रवृत्तीचा प्रश्न असतो. लौकिक शिक्षण सर्वांनाच सारखे देण्याचे काम प्राचीन काळच्या ब्राह्मणांनी इमाने इतबारे केले, त्यासाठी त्यांनी ऐहिक वैभवाकडे पाठ फिरवली होती अशी शैक्षणिक इतिहासाची ग्वाही आहे. इंग्रजांचे शासन रूढ झाल्यानंतरही भारतात बंगालसारख्या सनातनी आणि रुढिप्रिय प्रान्तातही गावागावातल्या शाळांची संख्या उल्लेखनीय होती आणि या शाळांत शिक्षण घेणाऱ्यांत असवर्णांची संख्या जास्त होती हे धर्मपाल यांनी The Beautiful Tree या आपल्या पुस्तकात सरकारी सर्वेक्षणांच्या आधाराने आकडेवारीच्या जोरावर दाखवून दिलेले आहे. पण लक्षात कोण घेतो ? वैदिक शिक्षण मात्र निर्दोष स्वरयुक्ततेवर भर देणारे असल्यामुळे काळाच्या प्रवाहात सर्वांना देणे उत्तरोत्तर कठिण होऊन बसल्यामुळे स्त्रियांना व शूद्रांनाच नव्हे तर सर्व सवर्णांनाही अशक्य झाले होते हे विसरून चालणार नाही.

वैदिक काळापासून इसवी सनाच्या दहाव्या अकराव्या शतकापर्यंतच्या शिक्षणपद्धतीत पुस्तकी विद्येच्या मर्यादा लक्षात घेऊन अनुभवसंपन्न गुरूच्या सान्निध्यात मिळणाऱ्या व्यवहारोपयोगी मार्गदर्शनावर जोर होता. पुराणकाळातील वैद्यकीय व इतर व्यवसायांचे शिक्षण घेणाऱ्यांनाही संस्कृतीसम्बन्धीची योग्य माहिती करून देण्याची काळजी विचारवंतांनी घेतली होती. पूर्वीपेक्षा आज अंतराची कल्पनाच कालबाह्य होत चालल्यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेला परदेशांत वाव मिळतो हे चांगले असले तरी या विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरा यांच्या विषयी काहीच माहिती नसते. यामुळे दुहेरी नुकसान होते. भारताबद्दलचे अज्ञान त्यांना स्वतःलाच खटकते, प्रसंगी मुखदुर्बळ बनवते. यापेक्षाही अधिक नुकसान परदेशांतील संघटित पद्धतशीर प्रचाराच्या प्रभावाला बळी पडल्यामुळे ते मनाने परदेशी होऊन जातात, हे आहे. या बाबतीत जागरुकतेचा अभाव, धर्महीन शिक्षणाच्या अट्टाहासाच्या परिणाम आहे. आमच्याकडील तथाकथित बुद्धिवादीही विद्यार्थ्यांचा बुद्धिभेद करून 'जे जे जुने ते वाईट, मागासलेले' असा त्यांचा ग्रह करून देतात व धर्माचा खरा अर्थ त्यांनाही माहीत नसल्यामुळे त्यांचे विद्यार्थीही धर्माच्या बाबतीत अंधारात चाचपडत राहतात. वस्तुतः आमच्या जयिष्णु परंपरेत धर्मात मनुष्याच्या वैयक्तिक आकांक्षेचा सामाजिक कर्तव्याशी सुसंवाद साधलेला होता. याकडे दुर्लक्ष करून खऱ्या अर्थाने राष्ट्रीय एकात्मतेला पोषक अशा मूल्यशिक्षणाची उभारणी करण्याची गरज आहे शालान्त परीक्षामंडळालाही सुदैवाने याची जाणीव झालेली आहे व परिपाठ आणि सामान्यज्ञानाची एक स्वतंत्र प्रश्नपत्रिका अभ्यासक्रमात समाविष्ट करून परिपाठात मूल्यविवेचनाला महत्त्व देण्याचा विचार बळावलेला आहे ही सुदैवाची बाब आहे. यासाठी प्राचीन भारतीय मूल्यांवर श्रद्धा व त्यांना अनुसरून शिक्षणाचे तंत्र अमलात आणणे, म्हणजे आचरण करणे या दोन्ही गोष्टींचा समन्वय शिक्षणाच्या नवीन धोरणात करावयाचा असेल, तर या बाबतीत जागरूक समाज निर्माण

(पान क्र. ३३वर)

# SIDDHIVINAYAK STONE CRUSHER

Gate No.379, Turbhe Store,
Turbhe, Navi Mumbai-400 705.
Ph. 768 0999

Resi. : 'Rajmal', Gauri Naka,
Kharigaon,
Thane - 400605.
Ph. : 534 75 24 / 536 80 03

# "अभिमन्यूचे व्रत"

श्री. यशवंत रा. साने

मला तुमच्याशी पुष्कळ बोलावयाचे आहे. पण अडचण आहे ती अशी की आपल्या भाषा निराळ्या आहेत. आपले संदर्भ वेगळे आहेत. बुचकळ्यात पडू नका! मी आहे एका विसाव्या शतकाच्या समाजांतील एक 'जीव'! तुम्ही पण ह्याच पृथ्वीवर ह्याच सूर्याच्या ग्रहमालेत नकळत - त्या सूर्यनारायणास फेऱ्या मारीतच आहात. जत्रेतल्या पाळण्यासारख्या - एखाद्या घोड्यावर बसून आकाशातले चंद्र, तारे, धूमकेतू हे आपल्या सगळ्यांकडे एका तटस्थतेने पाहत आहेत, आणा चित्र डोळ्यांसमोर!

असे समजू नका, की हे भान प्रत्येकाला आहे. 'आर्मस्ट्रॉंग' हा जेव्हा अमेरिकेच्या एका रॉकेटमधून चंद्रावर पोचला, तेव्हा त्याला जे विश्वाचे भान आले ना - त्या वस्तुस्थितीचे वर्णन किंवा मनोभूमिका मला अभिप्रेत आहे!

मला एक गोष्ट आठवते. एक मुलगा बडोद्याच्या पुलावरून खाली नदीकडे पाहत अगदी कठड्याच्या टोकाला पडेल ना पडेल अशा धोकादायक स्थितीत ओणवा होऊन बघत होता. माझ्यासारख्या एका अनुभवी मोठ्या गृहस्थाने त्याला पकडलेच. " अरे मरशील ना!" पण, मुलगा म्हणाला " एक दहाडे मरवूज छे!" हां!! हे तर खरेच! एके दिवशी सगळ्यांनाच मरावयाचे आहे. हे चित्र आहे, मला वाटते, श्री. अनंत काणेकर ह्यांच्या एका लेखातील! पण, ह्याला 'जीवाचे, परिस्थितीचे, काळाचे, समाजाचे, मानवी जीवनाचे किंवा विश्वाचे भान म्हणता येणार नाही. हे तर आहे एका बेफिकीर आणि अवलिया वृत्तीचे उत्तर!! त्यात अज्ञान तर आहेच, पण माझ्या म्हणजे माझ्या स्वतःच्या जीवनाचा उद्देश, कार्य, किंवा इंग्रजीत ज्याला " रोल" (Role) म्हणतात, त्याचेही भान नसणे - अशा एका ज्वलंत अभावाचेच दर्शन आहे!!

तुम्ही म्हणाल बिघडले कुठे? मग, हाच तर आहे- माझा मुद्दा!! तुमच्याशी बोलण्याचा!! तुमच्या काय, किंवा, आमच्याही व आमच्या अगोदरच्या काही पिढ्यांनी, हा उद्दाम बेदरकारपणा दाखवीत - दाखवीत जन्म काढला. आणि, जेव्हा मृत्यूने दार ठोठावले, तेव्हा, ही काय 'चीज' आहे, हे बिलकूल उमगलेच नाही. ह्या मोठ्या, पण निश्चित जीवनाच्या घटनेचा आपल्या आयुष्याशी, जीवनाशी काय संबंध असतो, त्याचा कधी विचारच केला नाही!! हे कदाचित बेफिकिरीचे उत्तम उदाहरण असेल. पण, शहाणपण किंवा "विज्डम" (wisdom) तर नव्हेच!!

आपण ज्या घरात जन्माला आलो त्याचे रूप, रंग, गुणदोष व सामाजिक फायदे, तोटे घेऊनच येतो. हा जन्म ही एक वैश्विक घटना असते. 'वैश्वानर विद्या' असे आपल्या भारतात ऋषिमुनींनी ह्याचे वर्णन केले आहे.

पाश्चिमात्य जग ह्याचा विचार निराळ्या पद्धतीने करते. ते एखाद्या "टेस्ट ट्यूब' मध्ये मुलाचा जन्म घडवून आणतात. अर्थात त्यांनाही पुरुष, स्त्री आणि निसर्गाच्या प्रक्रिया ह्यांचा मूळ आधार लागतोच. निसर्ग नियमांतच वावरावे लागते.

पण, मग ह्या जीवाला जे व्यक्तिमत्त्व येते त्याची प्रक्रिया कोणती? आपले पालक, शाळा, कॉलेज व प्रसंगोपात इतर समाज, हे आपल्याला ह्या अखंड मानवी व इतर जीवांच्या अगडबंब संसारयात्रेचे थोडेसे 'लौकिक भान' देतात. 'भौतिक भान' देतात.

समाजाने हस्तगत केलेल्या काही चिजा म्हणजे समाजव्यवस्था, संस्कृती, वैज्ञानिक शोध, विश्वाच्या उत्पत्ती, संवर्धन व विश्वाच्या लयाबद्दलच्या " थियरीज" सांगतात. आणि, हे समाजयंत्र, ही मेट्रोपोलिटन शहरे, ही विमाने, या इंडस्ट्रीज, ही जहाजे, हे पार्लमेंट (राज्यसंस्था) ह्या नगरपालिका, ही ज्ञानमार्गाची साधने चालवण्याचे, सांभाळण्याचे ज्ञान देतात. ह्यात तुमच्या जाणिवा फारशा

स्पष्ट नसतात. तर, त्या जीवनमार्गांच्या न टाकता येणाऱ्या बाबी म्हणून गळ्यात बांधण्यात येतात. ह्यालाच सर्वस्व मानायला शिकवतात ! तुम्ही नकळत या यंत्रणेत सामील होता.

तुम्हाला माहीत आहे का ? ह्या विरुद्ध काही माणसे बंड करतात. हिप्पी, संन्यासी, आत्महत्या करणारी मंडळी हे सगळे हा 'वसा', हे षड्यंत्र व ही जबाबदारी फेकून देतात. पण, अशी काही मंडळी सोडली तर-ज्याप्रमाणे तेलाच्या 'घाण्याला' जोडलेला बैल - डोळ्याला 'झापडे' बांधल्यामुळे - तेलाच्या 'घाणी' मध्ये गोल गोल फिरत राहतो ! ! जीवन संपेपर्यंत तसेच अगदी आपण फिरत राहतो !! मला तुम्हाला सांगावयाचे आहे - कानात - अगदी 'गुरुमंत्रा' सारखे की हे फडके आहे ना डोळ्यावरचे, ते फेकून द्या. ही तेलाची 'घाणी' आहे ना तिच्या मालकाला सांगा की माझी योग्यता ही काही बैलाची नाही - मी आहे मानव !! माझी वाटचाल आहे - दिव्यमानव बनण्याची !! मला हे माझे जीवन, हे विश्व ह्याच्या बद्दल पूर्ण ज्ञान मिळवावयाचे आहे. मला 'सत्य जगाचे', 'सत्य भान' हवे आहे. स्वप्नात किंवा मूर्खपणात जगावयाचे नाही.

आपल्या भारतात ह्या जीवनाच्या चित्राबद्दल सहा - षड्दर्शने आहेत. तुम्हाला कधीतरी सविस्तर सांगेन. पण, त्यांत एक 'चार्वाकाचे' आहे. 'ऋषी चार्वाक' !! पाश्चिमात्य जगाचे तत्त्वज्ञान - बहुतांशी, ह्या ऋषीच्या दृष्टिकोनाला जुळेल, रुचेल, पचेल असेच आहे.

काय म्हणतो तो ?

"ऋणं कृत्वा घृतं पिबेत्
भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः"

ह्याचा सरळ अर्थ की : हा जो राख बनणारा देह आहे - (मृत्यूनंतर) तो पुनः कुठे प्राप्त होणार आहे ? त्याचे पुनरागमन - (गणपतीचे होते ना दरवर्षी तसे १०० वर्षांनी तरी) कुठे होणार आहे ? कुठे ही खात्री आहे ? तेव्हा, ह्याच जन्मी - 'लॉटरी' लागल्यासारखे - कर्ज काढा, मौज करा व बेफिकीर जीवन व्यतीत करा. कुणालाही हे पटेल ! तसेच ते पाश्चिमात्य देशांना पटले, आणि ह्या अलौकिक, आणि साक्षात्कारी वैदिक धर्म मानणाऱ्या देशात अनेकांना ह्या तत्वज्ञानाचीच भुरळ पडली आहे.

ह्या सर्वांनी प्रमुखपणे वैदिक ऋषिमुनींच्या, हिंदुसमाजाच्या व इतर धर्मातील साक्षात्कारी मार्गांची टवाळकी, अवहेलना व मुस्कटदाबी पण केली. अर्थात, अपवाद आहेतच !! ज्ञानेश्वर, विवेकानंद, रमणमहर्षी, वसिष्ठ, वाल्मिकी, रामकृष्ण परमहंस, तुकाराम, नामदेव, गुरु नानक, महावीर जैन, गौतम बुद्ध, चैतन्य महाप्रभू आणि अनेक संतमहात्मे कंठशोष करून आपल्याला सांगत आहेत. पण परिणाम नाही ! ! ही जी 'भौतिक दृष्टीची' एकांगी पकड आहे ना आपल्या मनाला - ती विलक्षण 'गोची' आहे.

तुम्ही अनेक गणिते सोडवता, अनेक शब्दकोडी सोडवता, अनेक कॉम्प्यूटर गेम्स खेळता - पण महाभारतात अभिमन्यूच्या चक्रव्यूहाची गोष्ट आहे ना, तशी ह्या सर्व मानवजातीची अवस्था व स्थिती आहे. अभिमन्यूला चक्रव्यूहात शिरता आले-अगदी कौरवांच्या व्यूहरचनेचा भेद करून कुमार अभिमन्यूने चक्रव्यूहात प्रवेश केला, पण, पण काय - दुःखाची गोष्ट ही की त्याला बाहेर पडता आले नाही, व त्याचा वध करण्यात कौरव यशस्वी झाले !

अगदी तसेच नशीब हे मानवाच्या व इतर जीवांच्या वाट्याला आले आहे !! जन्म तर विनासायास (म्हणते तुमच्या आईच्या भूमिकेतून-बाजूने नव्हे-किंवा टेस्ट ट्यूब आणि डॉक्टरांच्या बाजूने नव्हे) झाला. पण,

आता मृत्यूचे जे आव्हान आहे ते जबरदस्त कोडे आहे. ती आहे वैश्विक विलक्षण व्यूहरचना. ह्याचे प्रणेते कौरवांसारखे दुष्ट नसले, तरी ते तुमच्याकडून एका जबाबदार, हुशार, संयमी, निग्रही व कष्टाला न भिणाऱ्या, स्वतःच्या भ्रमावर मात करणाऱ्या, अलौकिक प्रयत्नांची-बुद्धिमत्तेची अपेक्षा करतात. आव्हान देतात मैत्रत्वाचे !!

आमच्या पिढीने मात्र ह्या चिरंतन कोड्याच्या आव्हानाकडे जवळ जवळ दुर्लक्षच केले आहे. ह्या भौतिक जगाच्या - म्हणजे जंतरमंतरकडे एखाद्या सामान्य बुद्धीच्या किंवा अफू - गांजेकस व दारुड्याच्या बेफिकिरीने पाहिले आहे ! ! खंत वाटते मला !!

कारण, ज्या जिद्दीने व तळमळीने आपले वैदिक

(पान क्र. ३९ वर)



# श्री. मधु नाशिककर - एक कृतिशील जीवन

सौ. माधवी कुलकर्णी

गेली पन्नास वर्षे ठाण्यात वास्तव्य असलेले एक ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते श्री. मधु नाशिककर यांच्या पंचाहत्तरीच्या निमित्ताने त्यांच्या कार्याचा हा थोडक्यात परिचय.

सानेगुरुजी कथामाला, राष्ट्रसेवादल, राष्ट्रभाषा प्रचार सभा, जीवन विकास मंडळ, कुष्ठरोग निवारण समिती - शांतिवन अशा अनेक संस्थांना त्यांनी प्रत्यक्ष कार्याने हातभार लावला.

जन्माच्या दहाव्या दिवशीच पितृछत्राला वंचित झालेल्या नाशिककरांनी अत्यंत गरिबीत आणि प्रतिकूल परिस्थितीत आपल्या जीवनाची वाटचाल सुरू केली. सेवादलाचे संस्कार, गांधी-विनोबा यांच्या विचारांचा त्यांच्यावर पडलेला प्रभाव आणि, एस्.एम्. व दादा धर्माधिकारी यांचा संस्कारमय स्पर्श यांनी त्यांचे जीवन घडले.

स्वातंत्र्यसंग्रामात त्यांचा सहभाग होता आणि स्वतंत्र भारतातील आणीबाणीच्या विरोधातही त्यांनी कारावास भोगला. विशिष्ट मूल्याधिष्ठित व ध्येयनिष्ठ जीवन, त्यामुळे तत्त्वांशी कधी तडजोड नाही. जो ध्येयवाद आणि मूल्ये मनांत बाळगली ती त्यांनी आयुष्यभर जोपासली. त्यांचे जीवन स्फटिकासारखे अत्यंत निर्मळ आहे.

सानेगुरुजींच्या विचारांशी संबंधित असलेल्या सानेगुरुजी कथामालेशी त्यांचे दृढ नाते जुळले. कथामालेच्या जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. कथामालेच्या स्थापनेपासून आजतागायत कथामालेच्या कार्याशी ते एकरूप झाले आहेत.

सामाजिक बांधिलकीच्या जाणिवेतून पत्रकारिता केल्याबद्दल मुंबई पत्रकार संघाने १९९४ मध्ये नाशिककरांना 'समतानंद अनंत हरी गद्रे पुरस्कार' दिला. ठाणे येथे झालेल्या मराठी बालकुमार साहित्य संमेलनाचे ते स्वागताध्यक्ष होते. १९९५ च्या 'कथामाला' दिवाळी अंकाला मुंबई लेखक संघाचा पुरस्कार मिळाला होता. सानेगुरुजी सेवामंडळ, डोंबिवली तर्फे बालकल्याण व बालवाङ्मय क्षेत्रात लक्षणीय कार्य करणाऱ्या व्यक्तीस 'साने गुरुजी पुरस्कार' प्रदान केला जातो तो १९९६ मध्ये श्री. मधु नाशिककरांना प्रदान करण्यात आला. रविवार दि. ६ ऑक्टोबर १९९६ रोजी दादरला त्यांचा अमृत महोत्सव सोहळा साजरा होणार आहे.

सानेगुरुजींवरील आत्यंतिक निष्ठा व हाती घेतलेले कार्य पूर्णत्वास नेण्याची जिद्द यांमुळेच पंचाहत्तरी पार केलेले नाशिककर अजूनही पूर्वीच्याच उत्साहाने, उमेदीने व श्रद्धेने या कार्यात मग्न आहेत. त्यांच्या या कार्यपूर्तीसाठी त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो. 'जीवेत् शरदः शतम्'


---

(पान क्र. २९ वरून)

धर्म आणि शिक्षण

करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांचे संचालक, अध्यापक व पालक यांनी एकत्र येऊन सहेतुक प्रयत्न करणे ही आजची गरज आहे. त्यासाठी आमच्या धर्मशास्त्रकारांनी शिक्षण हा विषय शिक्षणशास्त्रज्ञांच्याच अखत्यारीत ठेवण्यासाठी गुरूला महत्त्व दिले. मनुप्रणीत शिक्षणव्यवस्थेत राजकीय सत्तेला चंचुप्रवेश करायला थोडी देखील जागा नव्हती. आज तर राजकारण सर्वग्रासी झालेले दिसते, त्याचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत चाललेला दिसतो. राजकारण्यांचा शिक्षणक्षेत्रातील प्रवेश टाळणे अत्यावश्यक आहे हे मनूने त्या काळी ओळखले होते. आज या संबंधाने आम्ही जितके जागरूक राहू शकू व वर सांगितल्याप्रमाणे धर्माच्या व्यापक विचाराची बैठक शिक्षणाला देऊ शकू, त्या प्रमाणात 'तेजस्वि नौ अधीतमस्तु' ही वैदिकांची उक्ती सार्थ ठरेल यात शंका नाही.

*With Best Compliments From*



# SUSHMA ENTERPRISES

EARTH MOVERS

CRANE OWNERS & TRANSPORT CONTRACTORS

***Office :***

● Parsik Reti Bunder, Mumbra, Thane.

● 1052, The Bombay Iron Merchants Association Building,

(BIMA) Kalamboli; Panvel, Raigad.

Phone : 534 86 21, 541 46 14

Kalamboli : 742 01 70

# Xerox चे जनक व परामानसशास्त्र

श्री. बसंत वि. अकोलकर

प्रत्येक विवाहित पुरुषाच्या कर्तृत्वामागे पत्नी असते असे म्हटले जाते. याचा अर्थ असा असतो की तिने स्वतः प्रपंचाची सर्व जबाबदारी सांभाळलेली असते, तिने पतीच्या अंगीकृत कार्याविषयी आस्था दर्शवलेली असते, पतीला सतत उत्तेजन दिलेले असते व त्याचे मनोबल वृद्धिंगत केलेले असते. परंतु पत्नीमुळे पतीला विशिष्ट विज्ञानशाखेविषयी (Interest) आस्था निर्माण झाली, तिचे स्वतःचे अनुभव त्या आस्थेस कारणीभूत झाले अशी उदाहरणे फार थोडी आढळतात. त्यापैकी एक म्हणजे Xerox उपकरणाची निर्मिती करणारे श्री. Chester Carlson (१९०६-१९६८) यांचे होय. त्यांना त्यांची पत्नी Dorris यांच्या अनुभवांमुळे परामानसशास्त्रात सक्रिय रस निर्माण झाला.

श्रीमती Dorris यांना १९४८ सालापासून विशेष - असामान्य स्वरूपाचे अनुभव येत असत. त्या ते अनुभव कार्ल्सन यांना सांगू लागल्या. Dorris यांना व्यक्तिनामे, स्थलनामे 'ऐकू' येऊ लागली. स्वतःला ठाऊक नसलेल्या व्यक्ती त्यांच्या मनःचक्षूंसमोर येऊ लागल्या. भावी घटनांची दृश्येही त्यांना दिसत असत. बरेचदा असेही होई की त्यांना रात्री पडलेले स्वप्न त्याच रात्री कार्ल्सन यांना देखील पडे. एके दिवशी सकाळी, श्रीमती Dorris यांनी स्वतःला 'ऐकू आलेले' शब्द आणि मनःचक्षूंपुढे आलेले दृश्य टिपून ठेवलेले होते. नेमके तेच कार्ल्सन यांनी स्वतःच्या स्वप्नात ऐकले व पाहिले. Dorris यांना कधी कधी पुढे घडणाऱ्या घटनेशी संबंध असलेले शब्द 'ऐकू' येत.

एकदा Dorris ना Liliput हा शब्द 'ऐकू' आला व त्यांनी तो त्यांच्या सवयीप्रमाणे टिपून ठेवला. त्यानंतर पाच-सहा आठवड्यांनी त्या व कार्ल्सन प्रथमच Canada मधील Toronto येथे गेले. एखादे पुस्तक विकत घ्यावे म्हणून Dorris, Hotel च्या Book-stand कडे वळल्या. त्यांच्या दृष्टीस Liliput नामक मासिकाचा अंक पडला. व त्यांनी तो विकत घेतला. त्या अंकामध्ये, एकच स्वप्न दोघांना ते पडत असे अशा पतिपत्नींची गोष्ट होती.

Dorris यांनी स्वतःचे अनुभव कार्ल्सन यांना सांगण्यास सुरुवात केली तेव्हा कार्ल्सन यांना आपल्या ठायी ही परा-सामान्य (para-normal) क्षमता आहे काय हे पाहावे असे वाटू लागले, व त्यांनी स्वतःची चाचणी घेण्यास आरंभ केला. एके दिवशी सायंकाळी ते शेकोटीजवळ डोळे मिटून व मन एकाग्र करून बसले. त्यांच्यापासून थोडेसे दूर Dorris वाचीत बसलेल्या होत्या. जवळच त्यांचा कुत्रा झोपलेला होता. थोडा वेळ गेल्यावर त्या खोली मध्ये स्फोट झाल्यासारखा आवाज झाला. तो आवाज भिंतीवर, जमिनीवर किंवा छतावर झालेला नव्हता; खोलीच्या बरोबर मध्यभागी झाला होता. Dorris त्या आवाजाने दचकल्याच, झोपलेला कुत्राही जागा झाला व त्याने ताडकन उडी मारली. अर्थात तो आवाज म्हणजे फक्त एकाच व्यक्तीला झालेला भास नव्हता-व त्यामुळे तो विचार करण्यासारखा होता. डॉ. मसिग्मुंड फ्रॉयड यांना डॉ. कार्ल युंग परामानसिक शक्तींचे अस्तित्व पटवून देत होते. त्यावेळी जवळच्या पुस्तकांच्या कपाटामध्ये स्फोटासारखा अचानक आवाज झाला. ह्या गोष्टीचे वाचकांना स्मरण असेलच. डॉ. युंग यांनी Memoirs, Dreams, Recollections या ग्रंथात ती नमूद केली आहे.

सदरहू घटनेनंतर कार्ल्सन यांनी १९४८ पर्यंत जेवढे परामानसशास्त्रीय संशोधनवाङ्मय प्रसिद्ध झाले होते, ते सर्व वाचून काढले. हे मानस संक्रमण (Telepathy), भूतकालीन घटनांचे, वर्तमान घटनांचे तसेच अतींद्रिय ज्ञान (Clairvoyance) तसेच भावी घटनांचे अतींद्रियरीत्या ज्ञान (Pre-cognition) इत्यादी परासामान्य प्रकारांच्या संशोधनामुळे मानवाच्या स्वरूपाचे आकलन होण्याच्या प्रयत्नामध्ये महत्त्वाची भर पडू शकेल अशी कार्ल्सन यांची पक्की धारणा झाली. American Society for Psychical Research (ASPR) मधील संशोधकांबरोबर ते विचारांची

व कल्पनांची देवाण-घेवाण करू लागले आणि संशोधन कार्यासाठी सढळ हाताने आर्थिक मदतही करू लागले. परामानसिक स्वरूपाच्या अनुभवांचा अभ्यास मानवजातीच्या उत्क्रांतीसाठी देखील उपयुक्त ठरेल असे त्यांना वाटे. ते म्हणत की वस्तुनिष्ठदृष्ट्या केले जाणारे वैज्ञानिक संशोधन महत्त्वाचे आहे. परंतु त्या संशोधनास व्यक्तिगत अनुभवांची (Subjective experience) देखील जोड दिली गेली पाहिजे.

परामानसशास्त्रीय संशोधनामध्ये प्रगती करण्याच्या कामी भारतीय योगपद्धती तसेच झेन बुद्धिस्ट पद्धती उपयोगी पडतील असे त्यांना वाटत होते. स्वामी विवेकानंदांच्या प्रतिदनासारखेच कार्लसन यांचेही प्रतिपादन होते. योगातील मानसशास्त्रीय पद्धतींना पाश्चिमात्य प्रयोगपद्धतींची जोड द्यावयास हवी असे स्वामी विवेकानंदांनी म्हटले होते. तसे केले की स्वतःच्या ठायी असलेल्या अव्यक्त (hidden) शक्तींवर मनुष्यास ताबा मिळवता येईल, स्वतःतील अव्यक्त क्षमता कार्यान्वित करता येतील आणि मानव जातीची उत्क्रांती जनुकांमधील (genes) बदलांवर (Mutations) अवलंबून राहू देण्याऐवजी आपण ती स्वतःच्या हाती घेऊ शकू असे विवेकानंदांनी म्हटले होते. कार्लसन यांना देखील अशी खात्री वाटत होती की अतींद्रिय शक्ती कार्यान्वित कशी करावयाची हे समजून घ्यावयाचे असेल तर मानसशास्त्रातील उद्दीपन -प्रतिक्रिया (S-R) पद्धतीने केलेले संशोधन, व्यक्तीच्या प्रेरणांविषयीचे संशोधन तसेच व्यक्तित्व गुणांविषयीचे संशोधन उपयुक्त शकेल. त्यांनी असे सुचवले की सूक्ष्म-संवेदी (psychics) व्यक्तींना जे ज्ञान होते, तसेच राजयोग्यांना जे ज्ञान होते ते कसे होते याविषयी संशोधन व्हावयास पाहिजे. त्या ज्ञानप्रक्रियेतील अंगभूत घटक वेगळे काढले पाहिजेत व त्यांविषयी संशोधन केले पाहिजे. कार्लसन आग्रहपूर्वक म्हणत की मरणोत्तर अस्तित्व असते काय ? या प्रश्नाचे उत्तर मिळणे शक्य नाही असे मानण्याचे कारण नाही. विज्ञानास त्या प्रश्नाचे उत्तर मिळवता येईल, विज्ञानाने त्यासाठी प्रयत्न केलाच पाहिजे.

कार्लसन यांच्या परामानसशास्त्रज्ञांशी वारंवार झालेल्या विचार विनिमयाचा परिणाम परामानसशास्त्रीय संशोधनास नव्या दिशा देण्याच्या रूपाने झाला. १९५० पर्यंत परामानसिक शक्तींचे अस्तित्व सिद्ध करण्यात संशोधक मुख्यत्वे गुंतलेले होते. त्या दृष्टीने डॉ. ऱ्हाईन यांच्या नेतृत्वाखालीअनेक प्रयोग करण्यात आले व त्यांचे सांख्यिकीय मूल्यांकन करण्यात येऊन परामानसिक शक्तींचे अस्तित्व शंकातीत ठरले. त्यानंतर अतींद्रिय ज्ञानाच्या प्रक्रियेशी कोणकोणते घटक संबंधित असावेत या प्रश्नाकडे लक्ष वळले व प्रक्रियालक्षी संशोधन (Process-oriented) सुरू झाले.

व्यक्तित्व गुणांवर परामानसिक क्षमता अवलंबून असतात काय ? या प्रश्नाला अनुलक्षून अनेक प्रयोग करण्यात आले. अंतर्मुख वृत्ती - बहिर्मुख वृत्ती यांचा संबंध असतो काय हे पाहण्यासाठी personality Inventory वापरून प्रयोग करण्यात आले. (१९५१-६३). स्वतःमध्येच गुंतलेल्या (ego involved) व्यक्तींचे प्राप्त अंक आणि अहं व्यतिरिक्त गोष्टीत रस घेत असलेल्या व्यक्तींचे प्राप्त अंक (scores) यांमध्ये सांख्यिकीय गणितानुसार अर्थपूर्ण फरक दिसून येईल काय हे पाहण्यासाठी Guilford-Martin Inventory वापरून प्रयोग करण्यात आले. आक्रमक वृत्तीच्या व्यक्ती व अनाक्रमक वृत्तीच्या व्यक्ती असे दोन गट घेऊनही प्रयोग करण्यात आले. (१९५४) . Rorschah Adjustment Inventory वापरून माध्यमांच्या (mediums) चाचण्या घेण्यात आल्या. (या चाचण्यांत असे आढळले की माध्यम मिलनसार (sociable) परंतु त्यांच्या ठिकाणी भावनिक अस्थिरता असते.) प्रयुक्तांनी आपापल्या पद्धतीने ध्यान केल्यानंतर त्यांचे प्राप्तांक कसे मिळतात हेही अभ्यासण्यात येऊ लागले. 'स्वतःच्या स्थूल देहाबाहेर पडू शकतो' असा दावा करणाऱ्या व्यक्तींची प्रायोगिक परीक्षा घेण्यात आली आहे.

१९५० नंतरच्या प्रायोगिक अभ्यासांचा तपशीलवार उल्लेख करण्याचे या लेखाचे प्रयोजन नाही. परामानसशास्त्रीय संशोधनाच्या नवीन दिशा व त्याची होत गेलेली प्रगती यांचे बरेचसे श्रेय Chester Carlson यांना जाते - हे मात्र खरे.

●●●

# महाविद्यालय परिसरातील निसर्गरम्य वाटा

श्री. मोहन पाठक

विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे महाविद्यालयाच्या परिसरात एक ऑगस्ट या वर्धापन दिनी वनमहोत्सवाचा एक कार्यक्रम घेण्यात आला. जिल्हाधिकारी श्री. उज्ज्वल उके, सामाजिक वनीकरण विभागातील अधिकारी, विद्या प्रसारक मंडळाचे पदाधिकारी आदी मान्यवर या प्रसंगी उपस्थित होते. विद्या प्रसारक मंडळाचे शिक्षणप्रेमी वयोवृद्ध अध्यक्ष डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या हस्ते एका वृक्षाचे रोपण करण्यात आले. त्यावेळी आयुष्यभर झाडे लावण्याच्या, झाडांवर माया करणाऱ्या या तपस्वी डॉक्टरांना महाविद्यालयाच्या हिरव्या परिसराने वाकून सलाम केला असेल.

या वृक्षरोपणाच्या कार्यक्रमातून आणखी एक वाट या परिसरात रुजवली गेली. त्या दिवशी जुन्या आठवणींनी माझ्या मनात गर्दी केली. आमच्या विद्यार्थिदशेत या परिसरात श्रमदान करून झाडे लावण्याचा कार्यक्रम व्हायचा. अशाच एका कार्यक्रमात कै. प्राचार्य म. द. नाडकर्णी यांच्या प्रेरणेने व डॉ. वा. ना. बेडेकरांच्या उपस्थितीत आम्हा विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात शिरताना उजवी कडील, नारळांची रांग, कला व विधी महाविद्यालयांच्या मध्ये असणारी नारळांची रांग, लावली होती. तेव्हाची बालरोपे आज मोठी झाली आहेत व शहाळ्यांनी लगडली आहेत. या शहाळ्यांचे पाणी पिताना त्याला असणारा गोडवा आम्हालाही फिकेपणा आणणारा असतो. उजवीकडे येतानाच शिरीषाचे डेरेदार झाड लागते व आपल्या पर्णसंभाराने विद्यार्थ्यांचे स्वागत करते.

महाविद्यालयाच्या परिसरात निसर्गाचे हे धन अमाप आहे. आमच्या वेळेपासूनच्या अनेक पिढ्या ज्याला 'हॉलीवुड' म्हणून संबोधत आल्या ते बांबू व नारळाचे बन ही आजच्या शहरी महाविद्यालयांच्या लेखी दुर्मिळ गोष्ट आहे. विशेषत: पावसाळ्यात महाविद्यालयाचा परिसर डोळ्यांना विलक्षण आनंद देणारा असतो. महाविद्यालयाच्या इमारतींमागील बाजूस पाहिले तर बालकवींच्या कितीतरी कविता मनात तरळत राहतात. हरित तृणाची मखमल असणाऱ्या हिरव्या कुरणात वाऱ्यामुळे उडणाऱ्या हिरव्या लाटा, दोन चिंचेचे मोठे वृक्ष, आमच्या महाविद्यालयाच्या फ्लेमिंगो निसर्ग मंडळाच्या विद्यार्थ्यांनी लावलेली झाडे, या सर्वांतून अचानकासारखा उडणारा एखादा बगळा, पार्श्वभूमीवर असणारी रेल्वेलाईन, त्यामागील डोंगर ... हे सारे स्वर्गीय दृश्य पाहिले की लँडस्केप या शब्दाचा नेमका अर्थ गवसतो.

या झाडाझुडपांच्या गर्दीत झाडांच्या कितीतरी जाती पाहायला मिळतात. केळ, चिंच, नारळ, बांबू, अशोक... अशी कितीतरी नावे घेता येतील. त्यात अलीकडेच दोन झाडांचा विशेष अभ्यास करताना मला खूप रोचक माहिती समजली त्यातील एक म्हणजे विज्ञान महाविद्यालयाच्या नव्या इमारतीतील आमच्या ग्रंथालयासमोरचे झाड. सुईसारखी याची बारीक पाने एकमेकास जोडण्याचा खेळ लहानपणी खूप खेळला होता. कॅशुरिनेसी या कुलातील कॅशुरिना या झाडाला मराठीत आपण सुरूचं झाड म्हणतो. पण ते नाव खरं तर या झाडाचं नाही. याला मराठीत 'खड शेरणी' असं नाव आहे. मुळात ऑस्ट्रेलियन असणाऱ्या या झाडाचा, समुद्र व खाडीच्या तीरावर आढळ होतो. याची मुळे माती धरून ठेवतात तर पाने वारा अडवतात. कोकणात सुरूचं बन म्हणतात ते हे खडशेरणी !

असंच एक झाड म्हणजे रॅव्हेनेल पाम, ज्याला ट्रॅव्हलर्स पामही म्हणतात. आपल्याकडे तुलनेने क्वचित आढळणाऱ्या म्यूझेसी या कुलातले झाड. पंख्यासारखी पसरणारी पाने केळीच्या पानासारखी, तर खोड नारळासारखं. महाविद्यालयातील व्यवस्थापन विभाग व वाणिज्य इमारत यांच्या मध्ये हे झाड आहे. एका अशाच वाटेवर कँटीनजवळ कॅलॉट्रॉपीस या कुलातील कॅलॉट्रॉपीस

ड्रोसेरा (मंदार) व कॅलॉट्रॉपीस जीजीशिया (रुई) दोन्ही रुईचे प्रकार असणारी झुडुपे आहेत. याच झाडावर रंगीत नाकतोडे ( Painted Grasshopper ) हे जुलै-सप्टेंबर दरम्यान मोठ्या संख्येने येतात. या नाकतोड्यांसाठी ही झुडपे जपली पाहिजेत.

कीटकांचा विषय निघाला तेव्हा परिसरात आढळणारी इतर जीवसृष्टी (अर्थात डुकरे सोडून) मनात जागी झाली. अनेक प्रकारचे असंख्य लहान सहान कीटक महाविद्यालयाच्या परिसरात आहेत. आम्ही विद्यार्थी असताना तर मागच्या गवतात पावसाळ्यात सापही पाहिलेले आठवतात. लेडी बर्ड बीट्ल, टॉरटॉइरूज बीट्ल, स्पीटल, बग... असे असंख्य रंगीबेरंगी कीटक इथल्या निसर्गाला समृद्ध करीत असतात. हिंवाळ्यात खाडीवर येणारे सी गल्स सँड पायपर (तुतवार हे मराठी नाव!) असे स्थलांतर करणारे पक्षी या परिसरात दिसतात, तर उपरोक्त खडशेरणीवर, नारळावर कित्येकदा विणीच्या हंगामात (मे-जून) कावळ्यांची घरटी आढळतात.

आमच्या विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणिशास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेच्या मागील बाजूस तांबट पक्षी कितीतरी दिसतात, तर मध्येच हॉलीवुडमध्ये उतरून किडे खाणारा भारद्वाजही पाहावयास मिळतो. या आमच्या महाविद्यालयांच्या दोन इमारतींच्या मध्ये १०-१२ वर्षापूर्वी मी एक गुलमोहोर लावला होता. आज तो गुलमोहोर छान वाढला आहे. १५ मे ते १५ जून च्या दरम्यान हा अग्निवर्ण वृक्ष कसा सुंदर दिसतो!

इथल्या परिसराशी माझं एक नातं आहे. इथली झाडं, झुडपं माझ्याशी नेहमी बोलतात, असं मला विद्यार्थी असतानापासून जाणवतं, म्हणूनच या गणगोताची निगा राखली जावी असं राहून राहून वाटतं. निसर्गाच्या सौंदर्यानं नटलेली ही जागा जपली पाहिजे, अधिक फुलली पाहिजे याचा ध्यास विद्या प्रसारक मंडळाला तर असतोच, पण शासनाच्या व महानगरपालिकेच्या संबंधित खात्यांनी या परिसरातील निसर्गधन जोपासण्यासाठी उदारपणे सर्व मदत केली पाहिजे. आमच्या या परिसरात युवाशक्तीचा नेहमी वावर असतो. ही मुलं हाताशी धरून खूप काम इथं होऊ शकतं, पण शासनाच्या व महानगरपालिकेच्या खात्यांनी पुढं येण्याची गरज आहे. मागील परिसरातील झाडांवर अधिक पक्षी यावेत, पक्ष्यांना आकर्षण वाटावे म्हणून नेस्ट बॉक्सेस सारखे प्रकल्प राबविता येतील. हिंवाळ्यात हा परिसर एक सुंदर पक्षिनिरीक्षणाचे बेट म्हणून विकसित करता येईल. या परिसरात मला न आढळलेले पोपट हे खरे तर आश्चर्यच वाटते. एकेकाळी तलावांनी समृद्ध असणाऱ्या या ठाण्यात पोपटांचे थवे मुळीच दुर्मिळ नव्हते, आता मात्र इतका छान परिसर असूनही पोपट आढळत नाहीत हे मनाला खटकत राहते. आमच्या मंडळाच्या डॉ. बेडेकर विद्यामंदिराचे चिटणीस सर मुख्याध्यापक असतानाच्या खोलीत बसायला मात्र फार आवडायचं, कारण सरांच्या मागच्या खिडकीतून होणारे वृक्षदर्शन आणि खारींचा आवाज. खारी झाडांवर दिसायच्या. या महाविद्यालयात खारी दिसत नाहीत ही एक उणीव मला नेहमी वाटते. अगदी अलीकडेपर्यंत अशोकाच्या शेंड्यावर बसून झुलणारे लाल बुड्या बुलबुलही मला या मे-जून मध्ये दिसले नाहीत. वाईट वाटले मला , खरे तर आणखी पक्षी यावेत असा हा परिसर आहे.

विद्यार्थिदशेत मागच्या झाडांखाली बसून तासन् तास अभ्यास केला होता असे कितीतरी मित्र आजही भेटतात. एखाद्या जुन्या मित्राची आठवण निघावी तसे ते, "वाणिज्य महाविद्यालयाच्या जवळचं झाड गेलं का रे ?" असं विचारतात. तेव्हा वाईट वाटतं. या झाडाझुडपांनी आमच्या मनांत किती खोलवर आठवणी रुजवल्या आहेत ते जाणवतं. मग सांगावं लागतं, " अरे, बिल्डिंग त्या बाजूला वाढवली ना ..." असाच प्रसंग प्रवेशद्वाराजवळचं बुचाचं झाड पडलं तो. तो दिवसही खूप उदास गेला होता.

या परिसरातल्या रम्य वाटांनी अशा आठवणींच्या कप्प्यांत पायवाटा करून ठेवल्या आहेत. निसर्गदेवतेला पडलेलं हे सुंदर स्वप्न आहे ... पण स्वप्नाला संपण्याचा शाप असतो तसा शाप मात्र या स्वप्नाला नसावा ...हे स्वप्न असंच, असंच फुलत राहावं. नव्या नव्या विद्यार्थ्यांच्या भावविश्वाच्या क्षितिजावर नवनवे वृक्ष बहरावे, पक्षी गावे. विद्याप्रसारक मंडळाच्या या निसर्गगीतातून आठवणींचे सूर असेच निनादत राहावेत.

●●●

## स्मृतिदिननिमित्ताने पुण्यस्मरण

५ ऑगस्ट १९७९. विद्याप्रसारक मंडळाच्या महाविद्यालयांच्या उभारणीत सिंहाचा वाटा असणारे मंडळाचे कार्याध्यक्ष गुणाकर जोशी यांचे आकस्मिक अपघाती निधन झाले. विद्याप्रसारक मंडळाची अपरिमित अशी हानी झाली. या कार्यनिष्ठ पदाधिकाऱ्याच्या पुण्यस्मरणाचा पाच ऑगस्ट हा दिवस.

या दिवशी संस्थेच्या आनंदीबाई जोशी विद्यालयात डॉ. वा. ना. बेडेकर यांच्या अध्यक्षतेखाली स्मृतिदिन कार्यक्रम आयोजित केला गेला. मुख्याध्यापिका सौ. कालिंदी कोल्हटकर यांनी कै. गुणाकर जोशींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहणारे भाषण केले. इतर कार्यक्रमांबरोबरच शाळेतील संगीतशिक्षिका सौ. वीणा जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भजने सादर केली.

मंडळाच्या व्यवस्थापन विभागातही स्मृतिदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी कै. गुणाकर जोशी यांच्या आठवणींना उजळा देताना मंडळाचे कार्यवाह श्री. अ. धों. टिल्लू यांनी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे विशेष स्पष्ट केले. या प्रसंगी श्रीमती चवाथे यांचे, 'व्यवस्थापनातील वागणूक', या विषयासंबंधीचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. डॉ. वा. ना. बेडेकर समारंभाच्या अध्यक्षस्थानी होतो. त्यांच्या अध्यक्षीय भाषणाने कार्यक्रमाचा समारोप झाला.

बारा ऑगस्ट हा कै. दयानंद बांदोडकर यांचा स्मृतिदिन. त्यांनी विद्याप्रसारक मंडळाला विज्ञान महाविद्यालयासाठी वडिलांच्या स्मृतिप्रीत्यर्थ त्या काळात तीन लाख रुपयांची देणगी दिली होती. या स्मृतिदिनानिमित्ताने विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य सी. जी. पाटील यांनी कै. बांदोडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. त्यांचे कार्यालयीन सहकारी श्री. सुधीर जोशी, श्री. मिसाळ आदींनीही भावपूर्ण रीतीने प्रतिमेस फुले वाहून कृतज्ञता व्यक्त केली.

**श्री. मोहन पाठक**

(पान क्र. ३२ वरून)

'' अभिमन्यूचे व्रत''

ऋषी व त्यांचे ज्ञान व उत्तरे आपल्या पिढीपर्यंत आणले - त्या भारतीय सनातन परंपरेचे कळकळीचे आवाहन आपल्या राजकीय व सामाजिक व्यवस्थेने एक प्रकारच्या बेफिकिरीने व अनुत्साहाने हाताळले. बुवाबाजी, अफरातफर, वैयक्तिक स्वार्थ, एकांगी भौतिकता, चंगळवाद अशा वृत्तींत अडकून 'सत्य' परिस्थितीकडे दुर्लक्ष केले. ह्याची पण खंत वाटते !!

हे भान तुम्हाला यावे याच एका अपेक्षेने मी हा संवाद साधत आहे. हा संवाद आहे एका मानवाचा एका नव्या पिढीतील, नव्या उमेदीच्या निर्व्याज तरुण मनाशी.

ह्या मनाला वाईट किंवा चुकीच्या वाममार्गाला ओढणारे अनेक धुरंधर कौरव आहेत. मला तुम्हाला त्यांच्या युक्त्या, प्रलोभने ह्यांबद्दल सावधानतेचा इशारा द्यावयाचा आहे. कारण, मी आहे आता एक झोळीतले अन्न संपलेला - किंवा संपत आलेला तुमच्याच वर्गाचा, भवितव्याचा आणि समान भविष्याचा मानव. मला आहे हे भान आणि आहे जिद्द कोडे सोडविण्याची !! अगदी कठोपनिषदातील नचिकेतासारखी. वाचाच तुम्ही ती कथा. जगातील एका विलक्षण संवादाची !! एका मर्त्य मानवाने प्रत्यक्ष - मृत्यूच्या देवाशी- यमाशी घातलेली हुज्जत, एक आग्रही जिज्ञासापूर्ती !!

पण, हे सर्व केव्हा शक्य आहे ? तुम्ही जर आमच्या या शतकातील समाजातील सध्याच्या भ्रमाचा भेद केलात तर !! तुम्ही आपला जीवनमार्ग कलुषित करणाऱ्या - बेजबाबदार करणाऱ्या राज्ययंत्राशी, भ्रष्ट समाजव्यवस्थेशी - त्यांचा डाव ओळखून झगडा केलात तर !! आणि, हे करताना आपल्या सहजप्रवृत्ती, मोह, आकर्षण ह्यांवर संयम, नियंत्रण केलेत तर,

मी कदाचित हरेन पण, तुम्ही यशस्वी व्हालच! यशवंत व्हा ! ! मला आशा आहे !!

आपला स्नेहांकित - सहप्रवासी

# संवाद स्वातंत्र्य देवतेशी

डॉ. विजय वा. बेडेकर

हे स्वातंत्र्य देवते, आम्ही तुला प्रणाम करतो.

सुमारे १००० वर्षांच्या परकीयांच्या गुलामगिरीतून तू आम्हाला मुक्त केलेस. या घटनेला ४९ वर्षे पूर्ण झाली, आणि स्वातंत्र्याच्या ५० व्या वर्षात आम्ही पदार्पण करीत आहोत.

हरिहर, बुक्क, राणा प्रताप आणि शिवाजी महाराज यांनी आपली आयुष्ये तुझ्या सेवेत खर्ची घातली,

आम्हाला 'स्वतंत्र' करण्याकरता.

गेल्या १५० वर्षात, कितीजणांची नावं घेऊ ?

शेकडोंनी आपल्या आयुष्याचे बलिदान करून तुझ्या चरणी सेवा अर्पण केली. आपल्या कौटुंबिक आणि वैयक्तिक जीवनाचा काडीचाही विचार न करता या स्वातंत्र्यसैनिकांनी तुझ्या अग्निकुंडात स्वतःला आनंदाने झोकून दिलं.

कशाकरता ?

आज तुझा चेहरा मला रागाने लाल झालेला दिसतो आहे.

तुझ्या डोळ्यातील क्रोध बघून माझा थरकाप होतोय.

तुझे डोळे कुणाला तरी शोधत आहेत.

मला ठाऊक आहे, कपटी, निर्लज्ज आणि भ्रष्टाचारी लोकांची तुला चीड आहे.

आळशी, निस्तेज, लाचार आणि कर्तव्यशून्य भक्तांवर तू कधीच कृपा करीत नाहीस.

पण लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सावरकर, विवेकानंद यांनी आमच्या 'पात्रतेची' , हे देवते, तुला ग्वाही दिली आहे. तुझ्या क्रोधामध्ये मला विश्वासघातच झाल्याची भावनासुद्धा दिसते आहे.

विन्स्टन चर्चिल तुला सांगत होते की ही मंडळी आपापसात भांडतील ,सभ्य संस्कृतीची लक्षणे यांच्यात दिसत नाहीत, 'दुर्जन' प्रभावी होतील आणि ते हवेवर सुद्धा 'कर' बसवतील.

त्यांच्याकडे दुर्लक्ष करून तू आम्हाला स्वतंत्र केलेस.

हे देवते, मी तुला शपथेवर सांगतो की आम्ही तुझा विश्वासघात अजून केला नाही.

आम्ही हवा प्रदूषित केली, पण हवेवर अजून कर बसवलेला नाही.

हे देवते अस्पष्टपणे तू काहीतरी बोललीस.

'टाडा ! रासुक ! खंडणी ! शिवशाही !'

देवते 'गगनभेदी गर्जनेने' आमच्यातल्या, सरस्वतीदेवीचा वर प्राप्त झालेल्या विद्वानांनी त्यांची मांडलेली बाजू तुझ्या कानावर अजून कशी पडली नाही ?

देवते, तू पोलिसांवर विश्वास ठेवू नकोस.

ते कोणालाही 'टाडा' लावतात.

ही मंडळी 'थोर' आहेत. त्यांनी समाजसेवा करता यावी म्हणून फार शिक्षणही घेतले नाही. हे लोक गरिबांकरता झटत असतात. गरिबाला न्यायालयाची दिरंगाई परवडत नाही, वकिलाची फी देता येत नाही . म्हणून कायदा हातात घेऊन ते गरिबांना मोकळ्या जागेवर, रस्त्यावर, पदपथावर घरं बांधू देतात. त्यांच्या वीज, पाणी इ. सगळ्याची सोय करतात. 'कृतज्ञतेच्या' भावनेतून लोक त्यांना निवडून देतात. गुरुपौर्णिमेला त्यांच्या पायावर डोकं ठेवतात.

देवते, आज सगळ्याच राजकीय पक्षांनी यांना मानाचे स्थान दिले आहे.

देवते, खरंच सांगतो आमच्यावर विश्वास ठेव, आम्ही यांच्या विरुद्ध कोणी कितीही लिहिले, बोलले तरी त्याकडे दुर्लक्ष करतो. वसई, उल्हासनगर, ठाणे महानगरपालिका सगळीकडे आम्ही यांना बहुमताने निवडून दिलं आहे.

देवते, आम्ही खस्ता खाऊ. पाणी, रस्ते, वीज काही मिळाले नाही तरी चालेल. पण आम्ही यांची पाठ सोडणार नाही. देवते, लोकशाहीतील शिस्त आम्ही पाळतो.

तुझे अजून समाधान झालेले दिसत नाही.

तुझे डोळे अजून कोणाला तरी शोधत आहेत. तू अजून अस्पष्टपणे काहीतरी बोलत आहेस.

'ठेकेदार ! ठेकेदार !!'

देवते, हा प्रश्न सुद्धा सुटला आहे.

देवते, लोकांकडे वेडावाकडा पैसा राहू नये म्हणून लाखो रुपये खर्च करून दरवर्षी तुझी पूजा करणारे तुझे अनेक 'भक्त' आहेत. या 'ठेकेदारां'च्या संघटनेचे अनेक 'अध्यक्ष' ही आहेत.

भ्रष्टाचार गाडून टाकण्याकरिता (?) ठेकेदार, दलाल अजूनपर्यंत 'स्वखुषीने' आणि अध्यक्षांना विचारून किती 'कमिशन' वेगवेगळ्या अधिकाऱ्यांना देत होते हे जाहीर होत आहे !!

यामुळे 'बेशरमपणा' आणि 'निर्लज्जपणा' धाडसीपणे सांगण्याला प्रत्यक्ष प्रामाणिकपणापेक्षा अधिक 'प्रतिष्ठा' प्राप्त होत आहे.

पंतप्रधान, मुख्यमंत्र्यांपासून, आयुक्तांपर्यंत कोणीही या गोष्टी फारशा मनावर घेत नाहीत. 'उघडपणे' वाटाघाटी करून असे प्रश्न समाधानकारकपणे, कोणालाच 'त्रास' होणार नाही अशा प्रकारे सोडवले जात आहेत.

देवते, कररूपाने आम्ही कोटी कोटी रुपये स्वतंत्र सरकारला देत आहोत.

हा कर अधिक वाढावा म्हणून सरकार दरवर्षी तेच तेच 'काम' ठेकेदारांकडून घेत आहे.

ठेकेदारांच्या कामाचा 'दर्जा' ढळू न देता प्रशासन पुन्हा पुन्हा पैसे खर्च करत आहे.

निवडणुका आल्या की, 'भ्रष्टाचार' खपवून घेतला जाणार नाही म्हणून ठेकेदारांचे 'अध्यक्ष' घोषणा करतात.

लोकांच्या स्मृती 'अल्पजीवी' असतात. 'अध्यक्ष' आणि ठेकेदारांचे 'स्वातंत्र्य' अबाधित रहाते.

देवते, तुझ्या उत्सवात या सेवेची चांगली भरपाई केली जाते.

देवते, तुझा क्रोध वाढू लागलेला दिसतो आहे.

तु पुन्हा काहीतरी पुटपुटत आहेस.

'मूर्ख, षंढ, लाचार !'

देवते, 'राज' कारणाचे 'बाळ' कडू आम्हाला आजच्या शिवशाहीत पाजण्यात आले आहे. शब्दकोषातला 'स्वातंत्र्या'चा अर्थ आता बदलला आहे. एकाधिकारशाहा, कुटुंबशाही, धटिंगण रॉबिनहूड यांच्या कृपाछत्राखाली 'आश्रित' म्हणून जगण्याला आम्ही 'स्वातंत्र्य' म्हणतो.

आजच्या वृत्तपत्रामधील 'मुख्यमंत्र्यां'चे हसणे आमच्या सगळ्यांचे 'प्रातिनिधिक' हास्य आहे !! 'आश्रितां'च्या वेदनाही कशा हसऱ्या असतात याचे हे चांगले उदाहरण आहे. भविष्यकाळातील इतिहासाच्या पुस्तकांमधून 'स्वातंत्र्याचे हसे' किंवा 'हास्यास्पद स्वातंत्र्य' या शीर्षकाखाली हे फोटो छापून येतील.

हे देवते, आमचे काही चुकले असेल तर क्षमा कर, पण आमचे 'स्वातंत्र्य' हिरावून घेऊ नकोस.

शेषन, खैरनार, तिनईकर यांसारख्या तुझ्या भक्तांच्या प्रयत्नांना यश येऊन 'निर्भय' चारित्र्यवान नेतृत्वाचे अंकुर कुठे कुठे फुटू लागले आहेत.

हे देवते, आमच्यापेक्षा या अंकुरांचे रक्षण कर. तुझ्याच रक्षणाची ही शस्त्रे प्रबळ कर.

आम्ही अर्जुनाचे वारस आहोत. 'अधर्मी' स्वकीय आणि सरस्वतीचे वरदान लाभलेले त्यांचे भाट, यांच्या विरुद्ध युद्ध करण्याकरता आम्ही 'कचरत' आहोत.

अजून तुला किती 'अधर्म' हवा आहे म्हणजे तू 'कृष्णाला' जन्माला घालशील ? 'अधर्मा'च्या ठेकेदारांचे निर्दालन करायचे असेल तर आमच्यातल्या 'कृष्णा'ला जागे कर, नाही तर हे 'स्वातंत्र्यदेवते', तुझे 'रक्षण' आम्ही करू शकणार नाही.

गुरुवार, १५ ऑगस्ट १९९६ रोजी भारतीय स्वातंत्र्याने ५० व्या वर्षात पदार्पण केले. आपल्या वरील भावना आणि स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा व्यक्त करण्याकरता तलावपाळीवरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला एक एक गुलाबपुष्प अर्पण करण्याचा कार्यक्रम 'सत्य शोध संस्थेने' आयोजित केला होता. सकाळी ७ ते दुपारी १ पर्यंत सुमारे १०० नागरिकांनी गुलाबपुष्प अर्पण करून या कार्यक्रमात सहभाग घेतला.

# वाढत्या खर्चाला हवे वाढते उत्पन्न
# आमच्याकडे ठेव ठेऊन व्हा सम्पन्न

## आकर्षक व्याज दर

# १५.५%

**मुदत ठेव**

| ठेवींची मुदत | व्याज दर |
|---|---|
| ३० दिवस ते १ वर्ष | ११.५% |
| १ वर्षावरील २ वर्षापर्यंत | १५.५% |
| २ वर्षावरील | १५% |

**५७ महिन्यांत दामदुप्पट**

**पुनर्गुंतवणूक ठेव योजना**

| ठेवींची मुदत | लाभ |
|---|---|
| १२ महिने | १२.०१% |
| २४ महिने | १७.७०% |
| ३६ महिने | १८.५१% |
| ४८ महिने | २०.०५% |
| ६० महिने | २१.७६% |

त्वरित व तत्पर सेवेसाठी भारत ध्वनी व भारत मुद्रा योजनेचा लाभ घ्या.

भारत ध्वनी

( TELE BANKING )

भारत मुद्रा

भारत सहकारी बँक लि. ठाणे

( BTM )

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखेत संपर्क साधा.

# भारत सहकारी बँक लिमिटेड,

'शततारका', बाजीप्रभू देशपांडे मार्ग, विष्णुनगर, ठाणे–४०० ६०२.

दूरध्वनी : ५४२९४३२/३३, ५३३५२३७, ५३४६२६७, ५४२९४३१

PERFECT PRINTS, THANE